रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १५६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## दिल्लीत पहिली शिखर परिषद

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय बुद्धिस्ट कॉन्फेडरेशनच्या सहकार्याने नवी दिल्ली येथे ५ ते ६ नोव्हेंबर २०२४ रोजी पहिली आशियाई बौद्ध शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे. 'आशिया खंडाच्या बळकटीकरणात बुद्ध धम्माची भूमिका' ही या शिखर परिषदेची मुख्य संकल्पना आहे. या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असल्याची सांगण्यात येत आहे. त्यामुळे देशभरातील बौद्ध धर्मीयांसह आशिया खंडातील विविध देशांतील नागरिकांचेही या परिषदेकडे लक्ष लागले आहे.

## जरांगेंचे शिलेदार ठरले

**जालना :** मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. यासाठी त्यांना काही मतदारसंघांवर शिक्कामोर्तब केलं असून, उमेदवारांचाही निर्णय झाला आहे. आतापर्यंत जरांगे यांनी बीड जिल्ह्यातील केज, जालना जिल्ह्यातील परतूर, नांदेड जिल्ह्यातील हदगाव, परभणी जिल्ह्यातील पाथरी, संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री मतदार संघात उमेदवार देण्याची घोषणा केली आहे. अजून इतर जिल्ह्यातील कोणत्या मतदारसंघात जरांगें उमेदवार देतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# दिवाळी विकेंड हाऊसफुल्ल

### पर्यटकांच्या वाहनांच्या महामार्गावर रांगाच रांगा

### भाऊबीजेसाठी जाणाऱ्या भावांना वाहतूक कोंडीचा फटका

### वाहतुकीवर नियंत्रण मिळविताना पोलिसांची दमछाक

। प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।

**जिल्हाभर मागील चार दिवसांपासून दिवाळीचा उत्साह धूमधडाक्यात सुरु आहे. त्याचबरोबर लागून आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे पर्यटकही रायगडात मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. त्यामुळे अलिबाग–रोहा, अलिबाग–रेवदंडा, अलिबाग–पेण मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. त्याचा फटका भाऊबीजेसाठी बहिणीकडे निघालेल्या भावांना बसला. अर्धा–पाऊण तासाच्या अंतरासाठी दोन–दोन तास वाहतूक कोंडीत अडकण्याची वेळ आली. सकाळी अकरा वाजल्यापासून या मार्गांवर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. तीन ते चार किलोमीटरपर्यंत अंतरावर वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांची दमछाक झाली. दरम्यान, दिवाळी सुट्टीचा हा शेवटचा आठवडा असल्याने रायगडातील किनारे, इतर पर्यटन स्थळे हाऊसफुल्ल झाल्याचे दिसून आले.**


(छायाचित्र- समीर मालोदे)

दिवाळी सणाला २८ ऑक्टोबरपासून सुरूवात झाली. दिवाळीची सुट्टी कुटुंबियांसमवेत घालविण्यासाठी मुंबई, पुणे येथील चाकरमानी गावी आले होते. तसेच पर्यटकदेखील जिल्ह्यात दाखल झाले होते. रविवारी (दि.३) भाऊबीजेसाठी भाऊ सकाळपासून घरातून बाहेर पडले. तसेच सुट्टीचा दिवस असल्याने पर्यटकही अलिबागमध्ये फिरण्यास आले. त्यामुळे अलिबाग- पेण, अलिबाग-रेवदंडा व अलिबाग-रोहा मार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा दिसून आल्या. पर्यटकांसह भावांना त्यांच्या निश्चितस्थळी पोहोचण्याची घाई असल्याने जसा मार्ग मिळेल, त्या ठिकाणाहून जाण्याकडे भर देत होते. सकाळी अकरा वाजल्यापासून अलिबाग-पेण, अलिबाग-रोहा व अलिबाग-रेवदंडा मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली. सहाण बायपास, रेवदंडा-अलिबाग, तसेच अलिबाग-पेण मार्गावरील पोयनाडजवळ दुपारचे तीन वाजून गेले तरीही लाडक्या भावांना व पर्यटकांना त्यांच्या निश्चितस्थळी पोहोचता आले नाही. वाहनांची वर्दळ वाढल्याने प्रवासी त्रस्त झाले होते. वाहतूक पोलिसांच्या नियोजनाच्या अभावाबाबत अनेकांनी संतापही व्यक्त केला.

> अलिबाग–पेण मार्गावरील पोयनाड, बेलकडे ते अलिबाग आणि रेवदंडा मार्गावर वाहनांची संख्या वाढली आहे. वाहने संथ गतीने चालत आहेत. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलीस प्रयत्न करीत आहेत.
> – श्री. लांडे, पोलीस निरीक्षक

### जलमार्गाने प्रवास करणाऱ्यावर भर

सुट्टीचा आनंद घेऊन पर्यटक रविवारी मुंबईकडे निघाले. रस्त्यांवर वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे पर्यटकांनी जलमार्गाने वाहतूक करण्यावर भर दिला. मांडवा बंदरासह अलिबागमधील खासगी बोटीच्या तिकीट कार्यालयासमोर तिकीट काढण्यासाठी प्रवाशांसह पर्यटकांनी गर्दी केली होती.



नवनवीन कपडे परिधान करून निघालेल्या भावांना वाहतूक कोंडीमुळे रस्त्यात तासन्तास थांबावे लागल्याने त्यांच्या अंगाची लाही लाही झाली •› पान २ वर

### अपुऱ्या मनुष्यबळाचा प्रवाशांना फटका

जिल्ह्यातील वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखा निर्माण करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील वाहतुकीचे नियोजन केले जात आहे. चार वर्षांपूर्वी सुमारे १२० वाहतूक पोलीस कर्मचारी होते. आता या कर्मचाऱ्यांची संख्या घटली असून, ७५ वाहतूक पोलिसांच्या भरोवशावर जिल्ह्यातील वाहतुकीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जात आहे. त्याचा फटका प्रवाशांना व पर्यटकांना बसत असल्याचे चित्र आहे.

## व्यावसायिकांना मिळाला दिलासा



। दिघी । वार्ताहर ।

पश्चिम किनारपट्टीवर सातत्याने निर्माण होणारी वादळसदृश्य परिस्थिती, अवकाळी पाऊस यामुळे पर्यटन व्यवसाय चिंताग्रस्त बनला आहे. अगोदरच कर्जाच्या विळख्यात अडकलेले पर्यटन व्यावसायिक ऐन दिवाळी पर्यटन हंगामात लागलेल्या निवडणूक आचारसंहितेमुळे आणखी अडचणीत आले असता, या विकेंडला पर्यटकांची तोबा गर्दी झाल्याने दिलासा मिळाला आहे.

मे महिन्यातील लोकसभा निवडणुका आणि आता ऐन दिवाळीच्या हंगामात लागलेल्या निवडणूक आचारसंहिताचा फटका या तालुक्यातील पर्यटन व्यावसायिकांना बसण्याची भीती कायम वाटत होती. •› पान २ वर

### दिवाळी हंगाम ठरला दोन दिवसाचा

दिवेआगरमध्येच महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ परवाना अंतर्गत निवास आणि न्याहरीचे १८० हून अधिक हॉटेल व घरगुती साधारण १६० व याव्यतिरिक्त २५ एक प्रमुख खानावळी असून, २१० हून अधिक दर्जे दार होम स्टे आहेत. मात्र, पूर्ण दिवाळी सुट्टीत एकच वीकेंडला दिवेआगर परिसर हाऊसफुल्ल दिसून आला.

## माथेरान घाट जाम

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानकरांचा महत्त्वाचा व्यावसायिक हंगाम असणाऱ्या दिवाळीत मोठ्या प्रमाणावर पर्यटकांनी गर्दी केली आहे. परंतु, स्वतःच्या वाहनाने येणाऱ्या पर्यटकांना घाटातील ट्रॅफिक जाम झाल्याने त्याचप्रमाणे काहींना दस्तुरी नाक्यावर पार्किंगची सोय नसल्याने माघारी जाण्याची वेळ आली आहे.

घाटात वाहनांची कोंडी झाल्याने लहान •› पान २ वर

> आम्ही पहिल्यांदाच याठिकाणी आलो आहोत, पण घाटातील वाहतूक कोंडीचे विदारक चित्र पाहून आम्ही इकडे आलो ती घोडचूक केली आहे असेच वाटते. जग फिरलो, पण अशी भयानक परिस्थिती इथेच अनुभवायला मिळाली आहे. यासाठी सरकारने इथे काहीतरी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.
> – अभिराज सोनटक्के, पर्यटक मुंबई

आजचा अग्रलेख
अमेरिकेत काय होणार?

## वे|ध|क

### टेन्शन वाढलं!

**मुंबई :** राज्यातील आणखी तीन उमेदवार नॉट रिचेबल झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. इच्छुक नाराज पदाधिकाऱ्यांनी बंडाचा झेंडा फडकावत उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीची डोकेदुखी वाढली आहे. बंडाळी शमविण्यासाठी आणि मोडीत काढण्यासाठी वरिष्ठांचे प्रयत्न सुरू आहेत. पालघर जि.प.चे अध्यक्ष आणि शिंदे गटाचे प्रकाश निकम यांच्या पाठोपाठ आता नाशिक जिल्ह्यातील दोन उमेदवार नॉट रिचेबल झाल्याने युतीची डोकेदुखी वाढली आहे.

### विद्यार्थ्यांना दिलासा

**मुंबई :** विद्यार्थ्यांना दहावी परीक्षेत गणित आणि विज्ञान विषयांमध्ये ३५ गुण नाही मिळाले तर तो विद्यार्थी नापास होतो. त्याला पुढे परीक्षा देऊन तेवढे गुण घ्यावेच लागतात. पण, आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्या दोन्ही विषयात किमान २० गुण मिळाले तरी अकरावीला प्रवेश मिळणार आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार याची अंमलबजावणी पुढील दोन वर्षात अपेक्षित आहे. याबाबत लवकरच निर्णय होणार आहे.

## भोईरांचे बंड, आमदारांचा डाव उधळणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज भरल्याने आमदार दळवी यांची डोकेदुखी वाढली आहे. त्यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी शिंदे गटातील आमदार महेंद्र दळवी यांनी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न सुरु केले आहेत. भाजपच्या एका कार्यकर्त्याला जवळ करून आपली पोळी भाजून घेण्याचा डाव त्यांनी आखल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. परंतु, त्यांचा हा डाव दिलीप भोईर हाणून पाडणार असल्यादेखील बोलले जात आहे.

आमदारकीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिलीप भोईर यांनी गेल्या २३ महिन्यांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला. गावे, वाड्यांमध्ये जाऊन त्यांनी पक्ष वाढविण्याचा प्रयत्न केला. भाजपच्या वेगवेगळ्या सभांमध्ये दिलीप भोईर गर्दी जमविण्याचा प्रयत्न केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेदेखील ही गर्दी बघून भारावून गेले होते. त्यामुळे त्यांनीदेखील भाजपचा आमदार असावा, असे स्वप्न भोईरांना दाखविले होते. वरिष्ठ पातळीवर चर्चा करू असे आश्वासनही सभेमध्ये दिले होते. भोईर यांना उमेदवारी मिळेल, अशी आशा होती.



परंतु, शिंदे गटातील महेंद्र दळवी यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर भोईर समर्थकांची घोर निराशा झाली. अखेर भोईर यांनी बंडखोरी करीत मंगळवारी २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरला. त्यांच्यासोबत भाजपच्या जिल्हा सचिवांसह काही पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिलीप भोईर यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर दळवी यांची डोकेदुखी वाढली. भोईर यांनी अर्ज भरू नये यासाठी त्यांनी वेगवेगळे प्रयत्न केले होते. परंतु, ते सर्व प्रयत्न असफल ठरले.

सोमवारी उमेदवारी अर्जावरील माघार घेण्याची प्रक्रिया आहे. भोईर यांनी अर्ज मागे घ्यावा, यासाठी दळवी यांनी भाजपच्या काही कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याविरोधात षड्यंत्र आखण्यासाठी पुढे ढकलले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दळवी यांच्या जाळ्यात भाजपचे कार्यकर्ते चांगलेच सापडले आहेत. त्यामुळे दळवी बोलतील यापद्धतीने त्यांनी दिलीप भोईर यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. •› पान २ वर

## कोण घेणार माघार?

### आज उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीसाठी १११ उमेदवारांनी १४० उमेदवारी अर्ज भरले होते. बुधवारी झालेल्या छाननीत २२ अर्ज अवैध, तर ११८ अर्ज वैध ठरविण्यात आले. सोमवारी (दि.४) दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्यानंतर उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे कोण माघार घेणार, कोण निवडणुकीच्या रिंगणात कायम राहणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील २२ उमेदवार वैध ठरले आहेत. महाडमधील पाच, श्रीवर्धनमधील १२, पेणमध्ये १२, कर्जतमध्ये १२, उरणमध्ये १६ पनवेलमध्ये १५ उमेदवार छाननीमध्ये वैध ठरविण्यात आले आहे. सोमवारी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत या अर्जांवरील माघार घेण्याची प्रक्रिया पार पडणार आहे. सकाळी अकरा



वाजल्यापासून ही प्रक्रिया सुरू होणार आहे. दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. त्यामुळे कोण अर्ज मागे घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

त्यानंतर उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे दुपारी तीननंतर उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने प्रचाराला सुरुवात होणार आहे. वेगवेगळ्या ठिकाणी सभा, बैठका घेऊन मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## जम्मू कश्मीरमध्ये दशहतवादी हल्ला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

### ग्रेनेड हल्ल्यात १२ जण जखमी

जम्मू कश्मीरमध्ये दशहतवाद्यांनी रविवारी (दि. ३) ग्रेनेड हल्ला केला आहे. या हल्ल्यात १२ जण जखमी झाले आहेत. सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

श्रीनगरच्या टीआरसी मैदानाबाहेर दहशतवाद्यांनी ग्रेनेड हल्ला केला आहे. आज रविवार असून बाजारात अनेक नागरिकांनी गर्दी केली होती. दहशतवाद्यांनी डाव साधत ग्रेनेड फेकला. या हल्ल्यात १२ जण जखमी झाले आहेत. हा हल्ला झाल्यानंतर पोलीस आणि सैन्य घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सर्व जखमींना रुग्णालयात दाखल केले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सुरक्षा दलाने हल्लेखोर दहशतवाद्यांचा शोध सुरू केला आहे.

## मटण, चिकन, मासळीवर ताव

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात भाऊबीज सणासाठी मांसाहारावर भर दिल्याचे पहावयास मिळाले. भाऊबीजेनिमित्त रविवारी (दि. ३) सर्वत्र मटण व चिकन तसेच मासळी खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळाली. भाऊबीजेला रविवार आल्यामुळे सर्वांनीच मांसाहारावर ताव मारला. सर्वच मटण, चिकन व मासे मार्केटमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची तोबा गर्दी होती. काही ठिकाणी तर खरेदीसाठी रांगा लागल्या होत्या.

पालीतील फिरोज तांबे या मटण विक्रेत्याने सांगितले की, भाऊबीज व रविवार असल्यामुळे गर्दी होणार हे माहीत होते. त्यामुळे आदल्या दिवशी सर्व तयारी व नियोजन करून ठेवले होते. ग्राहकांच्या आवडीनिवडीप्रमाणे त्यांना मटण दिले. व्यवसायही चांगला झाला. तर, हेमंत राऊत यांनी सांगितले की, ग्राहकांची खूप •› पान २ वर



### भाऊबीजनिमित्त खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड




• आपल्या भावाला ओवाळणी करून एकमेकांना भेटावस्तू देत चिमुरड्यांनी भाऊबीज साजरी केली. (छायाचित्र : समीर मालोदे)

### प्रचारासाठी रील्स स्टार, यूट्युबर्सला मागणी वाढली

# डिजिटल प्रचार रंग चढवणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील विधासभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून, प्रचाराची जोरदार तयारी सुरू झाली आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये राजकीय पक्ष त्यांच्या पक्षाचा प्रचार करण्यासाठी आणि मतदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करण्यावर जोर देत आहेत. उद्या सोमवारी (दि. ४) उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून, त्यानंतर खऱ्या अर्थाने प्रचाराला वेग येणार आहे. त्यामुळे



सर्वच पक्षांचा डिजिटल प्रचारावर भर राहणार असल्याचे चित्र सद्यः स्थितीत दिसून येत आहे.

दरम्यान, लाखो फॉलोअर्स असलेल्या रील्स स्टार आणि यूट्युबर्सना डिमांड आली आहे. त्यामुळे सोशल मीडियावर सक्रिय असलेल्यांना यंदाच्या •› पान २ वर

### 'रील्स स्टार' होणार मालामाल

निवडणुकीत रील्स स्टार यांना तुफान मागणी आहे. अनेक लोकप्रिय रील्स स्टारना प्रचारासाठी रील्स बनवण्याचे काम पक्षांकडून दिले जात आहे. बड्या रील्स स्टारची किंमत जास्त आहे; मात्र स्थानिक रील्स स्टारलादेखील चांगला मोबदला मिळत आहे. प्रचाराचे रील्स तयार करून ते पोस्ट करणे, यासाठी रील्स स्टार चांगले मानधन वसूल करत आहेत. त्यामुळे यंदा स्थानिक रील्स स्टारही मालामाल होत असल्याचे चित्र आहे.

> सोशल मीडियावरील प्रचाराला सध्या सर्वच पक्षांनी जोर दिला आहे. त्यामुळे सर्वच आयुधांचा वापर करण्यात येत आहे. असे जरी असले, तरी चांगल्या उमेदवाराचाच प्रचार करण्यावर माझा भर राहील. त्याचे कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम मी निश्चितच करेन.
> – संतोष राऊळ



# जो गद्दारी करतो, तो मुख्यमंत्री बनतो

## भाजप जिल्हाध्यक्षांच्या विधानाने खळबळ




**। उल्हासनगर, । प्रतिनिधी ।**

'आज जो गद्दारी करतो तो मुख्यमंत्री बनतो, राजकारणाची आजची व्याख्या बदलली आहे' असे गंभीर वक्तव्य उल्हासनगरच्या भाजप जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात केले. यावरून उल्हासनगरात शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला असून, भाजप उमेदवाराचे काम न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार आमदार कुमार आयलानी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

रविवारी महायुतीच्या मेळाव्यापूर्वीच शिवसैनिकांनी प्रदीप रामचंदानी यांना जाब विचारल्याने काही काळ तणावाचे वातावरण होते. शिवसैनिकांनी मेळाव्यावर बहिष्कार टाकला. जोपर्यंत भाजपचे वरिष्ठ याबाबत आपली भूमिका स्पष्ट करत नाही, तोपर्यंत आम्ही प्रचार करणार नाही, अशी भूमिका शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

एकीकडे महायुती इच्छुकांनी बंडोबांना थंड करण्यामध्ये शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या नाकी नऊ आले असताना उल्हासनगरात मात्र भाजपच्या एका बोलघेवड्या पदाधिकाऱ्याने वादग्रस्त वक्तव्य करत महायुतीत तणाव वाढवला आहे. जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत वादग्रस्त व्यक्त केले. 'राजकारणात जो गद्दारी करतो तो मुख्यमंत्री होतो, अशी राजकारणाची व्याख्या सध्या बदलली आहे, असे वक्तव्य रामचंदानी यांनी केले. जे आपल्या विरुद्ध होते, ते आज आपल्यासोबत आहेत, असेही रामचंदानी यावेळी म्हणाले.

# कोप्रोली गणेश मंदिरात दिवाळी पहाट



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील कोप्रोली येथील गणेश मंदिरात दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने सचिन रत्नाकर प्रोडक्शनच्या स्वरा देवेंद्र पाटील प्रस्तुत, मराठी भजन, भावगीते, भक्तीगीते आणि अभंगांनी नटलेल्या दिवाळी पहाट या कार्यक्रमात सप्तसुरांची उधळण झाल्याचे पाहायला मिळाले.

प्रारंभीच सुंदर ते ध्यान..उभे विटेवरी या गीतातून धनश्री कोळी (बंडा) यांनी आपल्या सुरवटीतून, जणू समोर विठ्ठल उभा करून रसिकांना प्रत्येक्ष विठू माऊलीचे दर्शन घडविले. तर उठ पंढरीच्या राजा या गीतातून देवेंद्र पाटील यांनी विठ्ठलाला साद घालत, रंगमंचावर आमंत्रित केलं. राम का गुणगाण करिये या हिंदी भजनातून ध्रुव म्हात्रे यांनी मर्यादा पुरुषोत्तम श्री रामाची आळवणी केली.

'संत गोरा कुंभार' या नाटकातील नाट्यपद गायिका धनश्री कोळी (बंडा) यांनी गायले. . तर भक्ती वाचूनी मुक्तीची, मज जडली रे व्याधी. विठ्ठला......मीच खरा अपराधी....अशी विठ्ठलाला देवेंद्र पाटील यांनी आर्त साद घालत पुन्हा एकदा विठ्ठल उभा केला.

धिरेंद्र ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. माजी प्राचार्य डी.बी. पाटील यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतातून या गायकांचे तोंडभरून कौतुक केले.

# काँग्रेस तालुकाध्यक्षपदी तिसऱ्यांदा बाळाराम मोरे

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक तसेच काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते बाळाराम बाबाजीराव मोरे यांची सलग तिसऱ्यांदा पोलादपूर तालुका काँग्रेस अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनी ही नियुक्ती एका पत्राद्वारे जाहीर केली आहे.



महाड विधानसभा मतदारसंघामध्ये काँग्रेसची भूमिका निर्णायक ठरणार असून, सद्यःस्थितीत सर्वच पक्षांच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू काँग्रेस पक्ष ठरल्याने बाळाराम मोरे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस नियुक्तीनंतर सांगितले.

पोलादपूर तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे जुने जाणते कार्यकर्ते म्हणून सर्वपरिचित असलेल्या बाळाराम बा.मोरे यांच्या गेल्या १५ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेकदा काँग्रेस पक्षसंघटना बांधून सुमारे १५० हून अधिक काँग्रेस निष्ठावंत कार्यकर्त्यांचा संच तयार केला आहे. रायगड जिल्ह्यातील सहकार चळवळीमध्ये बारकावे माहिती असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते अशी ओळख असलेल्या बाळाराम मोरे यांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसाठी संचालक पदाद्वारे सक्रीय योगदान दिले आहे. पोलादपूर तालुक्यातील पतसंस्था व सहकारी सोसायट्यांच्या निर्मिती व कार्यक्षम कारभारासाठी आग्रही असताना बाळाराम मोरे यांनी सहकार खात्याला वेळोवेळी मार्गदर्शनही केले आहे.

# आदिवासींना मिठाई, कपडे वाटप

## ■ वनवासी कल्याण आश्रमचा स्तुत्य उपक्रम



**। उरण । वार्ताहर ।**

सालाबादप्रमाणे वनवासी कल्याण आश्रम उरण तालुका यांच्यावतीने दीपावलीनिमित्त मिठाईवाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कोप्रोली वाडी, विंधने वाडी, कांठवली वाडी, जांभुळपाडा, वेश्वी वाडी अशा पाच वाड्यांवर मिठाई वाटप करून जनजाती बांधवांचे दिवाळी गोड करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कोप्रोली, विंधणे जांभुळपाडा या वाड्यांवर नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. विंधने वाडीवर बालसंस्कार वर्गातील मुलांनी सुंदर कविता बोलून दाखविली. उरण येथील बगाडे मॅडम यांनी सूचविलेल्या ज्या गुणी मुलाचा आम्हाला शोध घ्यायचा होता तो प्रत्यक्ष तिथे आम्हाला दिसला, आणि हा किल्ला बनवून त्याने त्याच्यातील कलागुणांची छोटीशी चुणूकच आम्हाला दाखवून दिली, अशी माहिती मनोज ठाकूर यांनी दिली.

सर्व वाड्यांवर भगवान बिर्सा मुंडा यांचे जयंतीनिमित्ताने भित्तीपत्रे चिकटविण्यास आली. यावेळी तेथील जमलेल्या सर्व जनजाती बांधवांना येत्या विधानसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून दिलेल्या मतदानाचा अधिकार वापरून १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सहसचिव कुणाल शिसोदिया, कोकण प्रांत बाल संस्करवर्ग प्रमुख सुनंदा कातकरी, ॲड. आकाश शाह, सोहम दर्णे, सुश्मिता दर्णे, अद्वैत ठाकूर, ऋग्वेद ठाकूर, अर्णव ठाकूर, निहाल गुडेकर ही मंडळी वाडीवरील जनजाती बांधवांना आनंद देण्यासाठी उपस्थित होते. बिना इंनवेस्टरचे विपुल शहा, सुशील दर्ने, जितेंद्र पटेल यांचे या उपक्रमाला सहकार्य लाभले.

## बंडखोरी रोखण्यात मविआला यश

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी भरण्यात आलेले उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा सोमवारी शेवटचा दिवस आहे. त्या पार्श्वभूमीवर बंडखोरी रोखण्यासाठी काँग्रेसच्या बड्या नेत्यांचे प्रयत्न सुरु होते. ते यशस्वी ठरले आहेत. गेल्या तीन ते चार दिवसांपासून काँग्रेसच्या वॉर रुममधून बंडखोरी रोखण्यासाठी फोनाफोनी सुरु होती. त्यात आठ नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, अशोक गेहलोत, भूपेश बघेल, नसीम खान, खासदार डॉ. नासीर हुसेन, टी. एच सिंहदेव यांनी बंडखोरांशी संवाद साधत त्यांची समजूत काढली. यातील बहुतांश बंडखोरांना शांत करण्यात काँग्रेसच्या बड्या नेत्यांना यश आलं असून, ते उमेदवारी अर्ज मागे घेणार आहेत.

# निकम इंग्लिश स्कूलतर्फे मतदान जागृती



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील इंदापूर एस.एस. निकम इंग्लिश स्कूलतर्फे मतदान जनजागृती फेरी दि.२ नोव्हेंबर रोजी काढण्यात आली. विधानसभा निवडणुका दि.२० नोव्हेंबर रोजी होणार असून, या निवडणुकीसाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली.

इंदापूर एस.एस.निकम इंग्लिश स्कूलतर्फे शाळेच्या परिसरामध्ये इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास सांगून याविषयी जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्ये तयार केली होती. रॅलीच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. या रॅलीमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका रंजिता जाधव, पूर्व प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका संचीता जाधव तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

## वांवजे सरपंचांची आगळी वेगळी दिवाळी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यामधील शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात असलेल्या वावंजे ग्रामपंचायतीचे सरपंच डी.बी. म्हात्रे यांनी आपल्या ग्रामपंचायती मधील बांधवांची दिवाळी सुखाची आणि समाधानाची जावी यासाठी ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक नागरिकांना मिठाई, उठणे आणि सुगंधी मोती साबणाचे वाटप करून परिसरातील नागरिकांची मने जिंकली आहेत.



वावंजे ग्रामपंचायतीचे सरपंच डी. बी. म्हात्रे हे २०१९ साली सरपंच झाल्यापासून आपल्या ग्रामपंचायतीचा विकास कसा होईल यासाठी वेळोवेळी प्रयत्न करत असतात. तसेच ग्रामपंचायतीमधील नागरिकांचे जे प्रश्न आहेत त्या प्रश्नाकडे जातीने लक्ष टाकून ते सोडवत आहेत. गावातील गोरगरीब नागरिकांना ते नेहमीच अडीअडचणीच्या काळात मदत करत असतात. मात्र, या गोष्टीचा ते कुठेही गवगवा करत नाहीत. हे सर्व करत असताना त्यांना कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य मच्छिंद्रनाथ पाटील आदींचे मार्गदर्शन आणि सहकार्य नेहमीच त्यांच्या पाठीशी असते. तसेच वावंजे ग्रामपंचायतीमधील शेतकरी कामगार पक्षाचे तरुण कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून त्यांच्या या कार्याला साथ देत आहेत.

पान १ वरून

## दिवाळी वीकेंड हाऊसफुल्ल

होती. ते घामाघूम झाले होते. काही प्रवाशांनी रस्त्यात उतरून दीन ते दोन किलोमीटरची पायपीट करीत त्यांच्या निश्चित स्थळी जाण्याचा प्रयत्न केला. ही वाहतूक कोंडी सुरळीत करताना पोलिसांची दमछाक उडाली.

जीपीएसचा वेश्वी, कुरूळकरांना त्रास

वाहनचालकांना त्यांच्या निश्चित स्थळी पोहोचता यावे, यासाठी जीपीएस प्रणाली कार्यान्वित झाली आहे. मुंबई, पुणे येथील पर्यटक मुरूड, काशीद व नागावकडे जाण्यासाठी या प्रणालीचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. जीपीएसद्वारे वेश्वी व कुरुळ गावातून पर्यटक त्यांचे वाहन घेऊन जातात. त्याचा त्रास स्थानिकांना होत आहे. अरुंद रस्त्यामुळे गावात अनेक वेळा वाहतूक कोंडी होते. रविवारी झालेल्या वाहतूक कोंडीचा नाहक त्रास वेश्वी व कुरुळकरांना प्रचंड झाला.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी स्थानिकांचा प्रयत्न

अलिबाग-रोहा मार्गावरील बेलकडे फाट्यावर वाहतूक कोंडी झाली होती. दरम्यान रुग्णांना घेऊन एक रुग्णवाहिका त्या रस्त्यावरून आली. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका पुढे जाणे शक्य नव्हते. अखेर स्थानिकांनी तसेच तेथील काही तरुणांनी पुढाकार घेत वाहतूक कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर रुग्णवाहिकेला जाण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

## व्यावसायिकांना मिळाला दिलासा

गेल्या काही वर्षांपासून पश्चिम किनारपट्टीवर वादळे धडकू लागले आहेत. यामुळे वादळसदृश्य परिस्थिति निर्माण होत असून, परिणामतः अवकाळी पाऊस पडत आहे.

मागे मे महिन्यात शालेय सुट्ट्या व पर्यटन हंगामात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने त्याचा परिणाम पर्यटनला बसला होता. आतासुद्धा ऐन दिवाळीच्या हंगामात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याने दिवाळीच्या हंगामात पर्यटकांनी पाठ फिरवल्याचे चित्र दिवाळीच्या सुट्टीत दिसून येत होती. मात्र, या शनिवार-रविवारी पर्यटकांचा ओघ वाढल्याने दिवाळी पर्यटन हंगामातला विकेंड हाऊसफुल्ल ठरला आहे.

पुन्हा आचारसंहिता

विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिति आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका लागण्याची शक्यता आहेत. त्यामुळे पुढील डिसेंबर ते मे महिना या शेवटच्या दिवसात पर्यटनाला मिळणाऱ्या सुगीच्या दिवसांत पुन्हा आचारसंहिता लागत राहणार असल्याचे दिसत आहे.

## माथेरान घाट जाम

मुलांना घेऊन तासन्‌तास ताटकळत राहावे लागले, तर काही पर्यटक आपल्या सामानासह घाटातून चालत दस्तुरी नाक्यावर आल्याने त्यांची खूपच दमछाक झाली होती. प्रशासनाला इथल्या पार्किंग सुविधेबाबतीत पूर्ण कल्पना माहिती असतानासुद्धा दरवेळेस याबाबत काहीही ठोस उपाययोजना केली जात नाही. त्यामुळे इकडे येणाऱ्या नवख्या पर्यटकांनासुद्धा इथल्या एकंदरीत परिस्थितीचा अंदाज येत नाही. नेरळ माथेरान हाच एकमेव मार्ग असल्याने अजून किती त्रास सहन करावा लागणार आहे, याबाबतीत शासनाला काहीच सोयरसुतक नाही का, असा प्रश्न पर्यटकांमधून उपस्थित केला जात आहे. या वाहतूक कोंडीमुळे अनेक पर्यटकांनी कर्जत तालुक्यातील फार्म हाऊसमध्ये तसेच लोणावळा, खंडाळा इथे जाणे पसंत केले, याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होत आहे.

## ... आमदारांचा डाव उधळणार

आपली पोळी भाजून घेण्यासाठी दळवींनी प्रयत्न सुरू केला असल्याची चर्चा जोर धरत आहे.

६० हजार मतांनी निवडून येणार असल्याचा गाजावाजा करणाऱ्या दळवींच्याविरोधात दिलीप भोईर उभे राहिल्याने दळवींची आमदारकीची वाट बिकट झाली आहे. मागील ग्रामपंचायत निवडणुकीच्या कालावधीत भोईरांनी दळवींवर विश्वास ठेवला होता. परंतु, त्यांनी त्यांचा विश्वासघात केला होता, याचा पुनरुच्चार अनेकदा भोईर यांनी जाहीर सभांमधून केला आहे. त्यामुळे दळवींबद्दल भोईरांच्या मनात तीव्र नाराजी आहे. भोईर यांनी माघार घेण्यासाठी अनेकांनी देव पाण्यात ठेवल्याची चर्चा आहे. भोईरांनी माघार घेतल्याची चर्चादेखील वेगवेगळया ठिकाणी करून भोईर यांच्या समर्थकांमध्ये गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे भोईर काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## मटण, चिकन व मासळीवर ताव

गर्दी होती. मात्र, भाव हे नेहमीप्रमाणेच ठेवले, त्यामुळे ग्राहक आनंदी होते. तर गौरी मनोरे या मासळी विक्रेतीने सांगितले की, मटण व चिकनबरोबरच मासळीवरदेखील अनेक खवय्यांनी ताव मारला. मासळी खरेदीसाठी खूप गर्दी होती. ग्राहकांसाठी ताजी मासळी आणली होती आणि योग्य दरामध्ये विकली.

भाऊबीजेनिमित्त अनेक बहिणी भावाकडे आल्या होत्या. तर काही भाऊ बहिणीकडे गेले होते. आणि त्यानिमित्ताने मांसाहारावर सर्वांनीच ताव मारला आणि भाऊबीजेचा येथेच आनंद घेतला.

## डिजिटल प्रचार रंग चढवणार

विधानसभा निवडणुकीत रोजगाराची संधी मिळणार आहे. काही वर्षांपूर्वी निवडणुकीच्या काळात विविध राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवार रस्त्यांवर, गल्लोगल्ली कार, रिक्षा आणि इतर वाहनांमध्ये लाऊडस्पीकर लावून, आपले निवडणूक चिन्ह असलेले झेंडे घेऊन प्रचार करायचे. मात्र, सोशल मीडियाचा वापर वाढल्यापासून डिजिटल प्रचाराला जोर आला आहे. आता प्रत्येक पक्ष आणि उमेदवारही आपापल्या स्तरावर सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रचार करताना दिसतो. व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, यूट्युब, एक्स, व्हॉट्सॲपचा प्रचारासाठी वापर वाढला आहे. अद्याप तरी लढतीचे चित्र स्पष्ट झालेले नाही. सर्वच राजकीय पक्ष आपापल्या पद्धतीने प्रचाराचे नियोजन करत आहेत. प्रचारसभा, रॅली, रोड शो यामार्फत जोरदार शक्तिप्रदर्शनाची तयारी सर्वच राजकीय पक्षांकडून सुरू आहे. यंदा प्रचाराची लढाई ही सोशल मीडियावर प्रामुख्याने लढवली जात आहे. त्यामुळे सोशल मीडियावर चांगले फॉलोअर्स असणारे तरुण यावेळी लखपती होणार आहेत.

**निवडणूक आयोगाची करडी नजर**

बदलणाऱ्या डिजिटल युगात निवडणूक प्रचाराच्या पारंपरिक पद्धती काही प्रमाणात कमी झाल्या असून, त्याची जागा आता सोशल मीडियाने घेतली आहे. त्यामुळे सोशल मीडियावरून केला जाणारा प्रचार व त्याचा खर्च यावर देखरेख करणे हे मोठे आव्हान आहे. त्यामुळे डिजिटल प्रचारांवर निवडूक आयोगाची करडी नजर आहे.

**असे आहेत निकष-**

सोशल मीडियावर खाते असणे अनिवार्य, २५ हजारांपेक्षा अधिक फॉलोअर्स, खात्यावरून पोस्टची नियमितता, रील्स बनवण्यात पारंगत, राजकीय समज, चांगल्या पद्धतीचे लाइव्ह, चांगले स्टीकर..

# कंत्राटी कामगारांना बोनसचे वाटप



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपालिकेतील कंत्राटी कामगार यांनी दिवाळी सणांसाठी सानुग्रह अनुदान बोनस म्हणून मिळावे यासाठी कामबंद आंदोलन केले होते. पालिकेच्या स्वच्छता विभाग, बांधकाम विभाग आणि माळी कामगार हे ठेकेदारी पद्धतीवर काम करणाऱ्या कामगारांना बोनस मिळावा म्हणून कामगार संघटना आक्रमक होती. मात्र, कामगारांना कोणत्याही प्रकारे दाद ठेकेदार आणि पालिकेकडून देण्यात येत नव्हती. त्यामुळे कामगारांनी कामबंद आंदोलन केल्यानंतर शहरातील कचरा जागोजागी दिसून येत होता. शेवटी पालिका मुख्याधिकारी यांनी पुढाकार घेऊन कंत्राट घेणारे ठेकेदार यांना आदेश दिल्याने अखेर कंत्राटी कामगारांना बोनस दिले.

दिवाळी बोनस मिळावा म्हणून माथेरान पालिकेत स्वच्छता,बांधकाम,आणि माळी कामगार यांनी कामबंद आंदोलन केले होते. दोन दिवस कर्मचारी काम न करता नगरपालिकेच्या आवारात ठिय्या मांडून बसले होते.

मात्र, एकाही ठेकेदाराने कर्मचाऱ्यांची दखल घेतली नव्हती आणि त्यामुळे कंत्राटी कामगार आक्रमक होत कोकण श्रमिक कामगार संघटना यांच्या झेंड्याखाली एकवटले होते. अखेर माथेरान गिरीस्थान नगरपालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी तातडीने युनियनच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून सर्व माहिती घेतली. कोकण श्रमिक संघाचे कर्जत तालुका अध्यक्ष दिनेश सुतार यांनी कर्मचाऱ्यांना बोनस घ्या अन्यथा कोणीही कर्मचारी काम करणार नाही, असे ठणकावून सांगितले. त्यावर मुख्याधिकारी इंगळे यांनी ठेकेदारांसोबत चर्चा केली आणि त्यावेळी कर्मचाऱ्यांना तात्काळ बोनस देण्यात यावेत अशी सूचना केली.

माथेरान पालिकेतील स्वच्छता,बांधकाम आणि माळी कामगार या विभागात काम करणाऱ्या १३० कंत्राटी कामगार यांना बोनस म्हणून ठराविक रक्कम भेट देण्यात आली.त्यामुळे कामगारांनी कोकण श्रमिक कामगार संघटनेचे आभार मानले.

## 'कुटुंब रंगलंय काव्यात' कार्यक्रम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोमसाप माणगाव व नागरिक सेवा फाऊंडेशन माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी पाडवा निमीत्ताने प्रा.विसुभाऊ बापट यांचा 'कुटुंब रंगलंय काव्यात' हा दिवाळी पहाट कार्यक्रम शनिवार, दि.२ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ९.३० या वेळेत माणगाव येथील कुणबी भवन येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

साहित्यविषयक कविता-गाणी, कथा, साहित्यावर आधारित विविध प्रकारांचा दिवाळी पहाट कार्यक्रमात प्रेक्षकांनी भरभरून आनंद घेतला. कार्यक्रमास रसिक प्रेक्षक, साहित्यिकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवाळीनिमित्त आयोजित या कार्यक्रमास कोकण मराठी साहित्य परिषद रायगडचे अध्यक्ष सुधीर शेट, जिल्हा समन्वयक अ.वि.जंगम, माणगाव नागरिक सेवा फाऊंडेशनचे सचिव भालचंद्र खाडे, तळा अध्यक्ष हेमंत बारटक्के, महाड अध्यक्ष गंगाधर साळवी, प्रा. प्रणय इंगळे, उद्योजक नंदकुमार राजपुरकर इत्यादी मान्यवर व जिल्ह्यातील विविध साहित्यिकांची उपस्थिती होती. माणगाव शाखा सचिव अपूर्वा जंगम यांना गुणवंत शिक्षिका म्हणून मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# कोकण कट्टाकडून आदिवासी भगिनींना भाऊबीज भेट




**। उरण, । वार्ताहर ।**

दिवाळी सणामध्ये आदिवासी भगिनींचीसुद्धा दिवाळी आनंददायी व्हावी यासाठी कोकण कट्टा, विलेपार्ले आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी (पनवेल) ह्या दोन्हीं सामाजिक संस्था मागील चार वर्षांपासून एकत्र येत आदिवासी वाड्या-पाड्यांमध्ये जाऊन आदिवासी भगिनींकडून ओवाळणी करून घेत त्यांना साडी-चोळी आणि दिवाळीचे फराळ भेट देऊन भाऊबीज साजरी करतात, यावर्षीही भाऊबीजेच्या निमित्ताने पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत दुश्मि-खारपाडा हद्दीतील स्वयंभू शिव मंदिर ठाकूरपाडा येथे कोकण कट्टा आणि ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी भगिनींसाठी साडी चोळी व फराळ भेट देण्यात आले.

गेली चार वर्षे सातत्याने हा स्तुत्य उपक्रम या दोन्ही संस्था राबवित असून, सदर कार्यक्रमात २५० भगिनींना भाउबिज भेट देण्यात आली. याप्रसंगी कोकण कट्टाचे संस्थापक अध्यक्ष अजित पितळे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, सुनील वनकुद्रे, जगन्नाथ गावडे, सुजित कदम, हेमंत सावंत, विजय खोपे, चेतन जळगावकर, प्रथमेश पवार, विजय बाईत, दत्ता सोनपावले, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते राजू पाटील, मानसीताई पाटील, सचिन पाटील, स्मिता रसाळ, शैलेश कोंडसकर, प्रा. जयेश शिंदे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

निवडक

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**उरण :** गोरगरिबांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे. रक्ताअभावी कोणाचे जीव जावू नये. या अनुषंगाने दरवर्षी स्व. गुलाब म्हात्रे यांच्या स्मरणार्थ स्व.गुलाब म्हात्रे मित्र मंडळ जसखार यांच्या तर्फे गरजूंना जीवनदान देण्याच्या उद्देशाने दरवर्षी जसखार येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. यंदा स्व. गुलाब म्हात्रे यांच्या स्मरणार्थ रविवारी (दि १० ) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## निरीक्षकांनी घेतला आढावा

**रायगड :** निवडणूक निरीक्षक सतीश कुमार एस यांनी घेतला महाड विधानसभा मतदारसंघातील निवडणूक कामकाजाचा आज आढावा घेतला. स्ट्राँग रूम आणि मतमोजणी केंद्राची पाहणी करून भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. सतिश कुमार यांनी निवडणुकीचे नोंदणी कार्यालय, स्ट्रॉग रूम, एम.सी.सी, कंट्रोल रूम, साहित्य विभाग, सी.सी. टी.व्ही, आचारसंहिता कक्ष, कंट्रोल रूमची पाहणी केली.

## अनंत थिटे यांचा सन्मान

**खांब :** रोहा तालुक्यातील बाहे गावचे सुपुत्र तथा तालुका कुणबी युवक मंडळाचे अध्यक्ष अनंत बाळू थिटे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन सन्मान नि:स्वार्थी समाजकार्याचा या पुरस्काराने विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. यावेळी चंद्रकांत बावकर, अनिल नवगणे, सुरेश मगर, कृष्णा बने, महेश शिर्के, कृष्णा कोबनाक, अविनाश लाड, रोहिदास दुसार, राजेश बेंडल, सुनील ठाकूर, नवनित डोलकर, शशिकांत कडू, विकास खांडेकर आदी उपस्थित होते.

## आदिवासींना मिळणार घर

**नेरळ :** कळंब येथील सुतार पाडा येथे राहणारा आंबो कमळू पारधी हा तरुण मागील १५ वर्षांपासून आपल्या छोट्या मुलांसह मोडक्या झोपडीत जीवन जगत होता. ग्रामपंचायतीकडून घरकुल योजनांचा लाभ त्याला मिळू शकला नाही कारण त्याच्या मागे कोणतेही आधार नव्हता आणि त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते दीपक बोराडे यांनी त्या कुटुंबाची कथा जगासमोर आणली आणि त्या कुटुंबाला आता मुंबई येथील इशार्जुन फाउंडेशनकडून घरकुल उपलब्ध करून दिले जाणार आहे.

## दीपोत्सवाचे आयोजन

**पाली/गोमाशी :** श्रीक्षेत्र रामवाडी पाच्छापूर येथील श्रीराम मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे बलिप्रतिपदा व दिवाळी पाडवा निमित्त रामवाडी ग्रामस्थ मंडळ व श्रीराम सेवा मंडळ, रामवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यंदाचे वर्ष श्रीराम सेवा मंडळातर्फे सन २०२६ मधे साजरा होणाऱ्या अमृत महोत्सवी श्रीराम जन्मोत्सवानिमित्त प्रतिकात्मक अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार असल्याचे मंडळाने रामनवमीच्या दिवशीच जाहीर केले होते.

### आरटीई, अभ्यासक्रम आराखड्यात समानता गरजेची

# अध्यापन तासांमध्ये विसंगती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**शिक्षण हक्क कायदा आणि प्रस्तावित राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार वर्षभरात शैक्षणिक कामकाजासाठी द्याव्या लागणाऱ्या तासांमध्ये फरक असल्याचे समोर आले आहे. राज्य आराखड्यातील तरतुदीनुसार शाळांचे शैक्षणिक कामकाज आणि एकूण तास यात वाढ होणार आहे. त्यामुळे कायदा आणि धोरण यात विसंगती निर्माण होत असून, अंमलबजावणीसाठी आरटीई किंवा धोरणात बदल करावा लागण्याची शक्यता आहे.**



देशभरातील सहा ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद शिक्षण हक्क कायद्याद्वारे करण्यात आली. या कायद्यात शिक्षण, शाळा, विद्यार्थी, शिक्षक अशा सर्व घटकांचा बारकाईने विचार करून नियमावली करण्यात आली आहे. या कायद्यानुसार पहिली ते पाचवी या वर्गांसाठी शैक्षणिक वर्षात घड्याळी आठशे तास, तर सहावी ते आठवी वर्गासाठी शैक्षणिक वर्षात घड्याळी एक हजार तास शैक्षणिक कामकाजासाठी द्यावे लागतात. त्यानुसार सध्याचे शैक्षणिक कामकाज करण्यात येते. या पार्श्वभूमीवर राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तिसरी ते बारावीसाठी अंतिम केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा नुकताच जाहीर केला. या आराखड्यात वर्षभरात शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीने तिसरी ते पाचवीसाठी वर्षभरातील अध्यापनासाठी एक हजार तास, तर सहावी ते बारावीसाठी १२०० तास देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शाळेचे एकूण कामकाजाचे तास वाढणार असल्याचे दिसून येत आहे. आरटीईनुसार वर्षभरात आठशे आणि एक हजार तास शैक्षणिक कामकाज करावे लागते. तर प्रस्तावित आराखड्यानुसार एक हजार आणि १२०० तास कामकाज करावे लागणार आहे. सध्या शाळांच्या तासिका ३० ते ३५ मिनिटे असतात. त्यात वाढ होऊन ती चाळीस मिनिटे होणार आहेत. शैक्षणिक वेळापत्रकात विषयही वाढणार आहेत. परिणामी शाळांचा वर्षभरातील कालावधी वाढणार आहे. त्यामुळे आरटीई आणि अभ्यासक्रम आराखडा यात बदल करून समानता आणावी लागणार आहे. शाळांची वाढणारी वेळ शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अडचणीची ठरू शकते. ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थी बसने प्रवास करतात. बसची वेळ ठरलेली असते. शाळेची वेळ वाढल्यास विद्यार्थ्यांचे वेळेचे नियोजन बिघडणार आहे.

# गुलाब वाघमारे झाली ‘झिरो टू हिरो’ पुरस्काराची मानकरी

**। खांब । वार्ताहर ।**

आदिवासींचे स्थलांतर थांबवण्यासाठी झगडणारी रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथील रहिवासी असणारी गुलाब सुरेश वाघमारे ही झिरो टू हिरो पुरस्काराची मानकरी ठरली आहे.




आदिवासी समाजातील असलेला मागासलेपणा आणि कामासाठी होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी आणि आपल्या समाजासाठी रोजगार निर्मितीचा प्रयत्न करणाऱ्या गुलाब वाघमारे यांना यावर्षीच्या कोकण कला व शिक्षण विकास संस्थेच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त ‘कोकण कला महोत्सव’ या कार्यक्रमात राज्यस्तरीय झिरो टू हिरो या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ३१ ऑक्टोबर रोजी मुंबई, दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहामध्ये संपन्न झालेल्या या भव्य सोहळ्यात पद्मश्री राहीबाई पोपेरे, हास्य जत्रा फेम अभिनेते ओंकार भोजने, हिरवळ ग्रुपचे अध्यक्ष किशोर धारिया, लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापिका रेणुताई दांडेकर, आवाजाचे जादूगार आणि मराठी सिनेसृष्टीतील दिग्दर्शक श्रीनिवास नार्वेकर, सिंधुदुर्ग बँकचे उपाध्यक्ष दिनकर तावडे आणि कोकण संस्थेचे अध्यक्ष दयानंद कुबल यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

## मतदान जनजागृती मोहीम

**। माणगाव । वार्ताहर ।**

‘जागा हो जागा हो मतदारराजा जागा हो, धागा हो धागा हो लोकशाहीचा धागा हो.’ या उक्तीला अनुसरून आपल्या लोकशाही प्रणीत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुका दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार असून स्वीप कार्यक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील राजिप कशेणे शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती मोहीम हाती घेतली.

शंभर टक्के मतदान व्हावे यासाठी निवडणूक आयोग पुरस्कृत ‘स्वीप’ कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या स्वीप कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळा कशेणेमध्ये विविध उपक्रमांचेआयोजन करण्यात आले. प्रथमतः संपूर्ण गावातून रॅली काढून मतदार जनजागृती पर घोषणा देण्यात आल्या. तसेच शाळेमध्ये मतदान जनजागृतीपर चित्रकला स्पर्धा रंगभरण स्पर्धा व रांगोळी स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते चौथीतील काही विद्यार्थ्यांनी गावातील सर्व लोकांनी मतदान करावे यासाठी एक छोटीशी नाट्यछटा सादर केली. तसेच शासनामार्फत प्राप्त झालेले संकल्पपत्र विद्यार्थ्यांच्या मार्फत पालकांपर्यंत पोहोचविण्यात आले. अशाप्रकारे स्वीप कार्यक्रमात कशेणे शाळेने उस्फूर्त सहभाग घेऊन खारीचा वाटा उचलला.

# धांनसर गावात गुरे उधळवण्याची प्रथा

**। पनवेल । वार्ताहर ।**

शहरीकरणाच्या कचाट्यात एकीकडे ग्रामीण भागात सण उत्सवाच्या काळात पूर्वी पाळण्यात येणाऱ्या प्रथा नष्ट होत असतानाच पनवेल पालिकेत समाविष्ठ धांनसर गावातील ग्रामस्थ मात्र आपल्या प्रथा परंपरा अद्यापही सांभाळून असल्याचे पाहायला मिळत आहे.

पूर्वीच्याकाळीबळीप्रतिपदेच्या दिवशी गुराढोरांना गावाच्या वेशीवर उधळवण्याची प्रथा ग्रामस्थांनी अद्यापही कायम ठेवली असून, शनिवारी (दि.२) देखील प्रथेप्रमाणे गुराढोराना सजवून या प्रथेच पालन केल्याचं पाहायला मिळालं आहे.

एके काळी शेती हा प्रमुख व्यवसाय असलेल्या धांनसर गावच झपाट्याने शहरीकरण होत आहे.



शहरीकरणा मुळे गावाचं रुपड पालटल्याने शेती हा व्यवसाय गावातून जवळपास संपुष्टात आला आहे. परिणामी शेती कामा साठी पूर्वी जोपसल्या जाणाऱ्या गुरा ढोरांची संख्या कमी झाली आहे. असे असतानाही गावातील काही शेतकरी अद्यापही शेती टिकवून आपल्या प्रथा परंपरा पाळत आहेत. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात भात शेती केली जात होती . त्या करिता जवळपास प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी बैलजोडी सोबत गाई म्हशी पाळण्याची पद्धत असल्याने दिवाळी दरम्यान येणाऱ्या बलिप्रतिपदा या दिवशी पहाटे लवकर उठून घरातील गुराढोरांना आंघोळ घालून सजवण्याची व गावाच्या वेशीवर गवताच्या गंजिना आग लावून त्या वरून गुरे उधळण्याची प्रथा पाळली जात होती.

विशेषतः ठाणे, रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ग्रामीण भागातील गावात साजरी करण्यात येणारी ही प्रथा अनेकांनी शेतीची काम कायमची बंद करून गुरे पाळणे बंद केल्याने कमी झाली असली तरी तालुक्यातील काही गावात आजदेखील काही प्रमाणात ही प्रथा पाळण्यात येत असून पनवेल पालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील धांनसर गावातील काही व्यक्तींनी देखील ही परंपरा अद्यापदेखील जिवंत ठेवली आहे.

**मागील काही वर्षात प्राणी मित्रांकडून या प्रथेवर टीका केली जात आहे. या प्रथेमुळे गुरांना इजा होण्याची शक्यता असल्याचे प्राणी मित्रांचे म्हणणे आहे.मात्र ही प्रथा साजरी करण्यामागे शास्त्रीय कारण आहे. गावाच्या वेशीवर वाळलेल्या गवताचा जाळ करून त्यावरून बैल जाळावरून उडवले जातात. या प्रथेमागे सांगितल्या जाणाऱ्या शास्त्रीय करणानुसार भातशेतीची चिखलणी व लावणी झाल्यावर पावसाळ्यातील दोन अडीच महिने बैलांना काही काम नसते. बैल हिरवेगार गवत खाऊन घरातल्या गोठ्यांमध्ये असतात. त्यामुळे त्यांच्या पायांना सतत ओलाव्यामुळे जखमा व रोग राई होते. काम नसल्याने काहीशा सुस्तावलेल्या बैलांना बळीप्रतिपदेला धूर व आगीवरुन उडवले जाण्यामुळे त्यांच्या अंगावर पायांवर असलेले रोग व जीवजंतू नष्ट होतात. तसेच धूर व आग यांच्याशी संपर्क आल्याने बैलांच्या मनात आग व धुराबद्दल असलेली भीती निघून जाते. दिवाळी संपली की लगेच शेतीची मशागत करण्यासाठी बैलांमध्ये उत्साह व चैतन्य निर्माण होते. यावेळी प्रत्येक शेतकरीदेखील बैलांच्या पुढे जाऊन स्वतः धुरात आणि आगीवरून जातो आणि त्याच्या मागे आपल्या बैलांना ओढत नेतो. दरवर्षी शेतात राबराब राबणाऱ्या बैलांची ईडा पिडा टाळण्यासाठी पूर्वजांनी सुरू केलेली ढोरे उडवण्याची प्रथा नामशेष होण्याच्या मार्गांवर असली तरी काही गावात आजदेखील ही प्रथा उत्साहात साजरी केली जाते.**



- दिवाळी हंगामात एकदरा परिसरात सकाळी आकाशात ढगांची नक्षी पाहायला मिळते. पाऊस नसल्याने मुरूड तालुक्यातील वातावरण थंड असून पर्यटनासाठी उत्तम आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# माथेरानची मिनीट्रेन ५ नोव्हेंबरपासून धावणार

**। माथेरान । वार्ताहर ।**

सर्वानाच प्रतीक्षा असणारी नेरळ माथेरान दरम्यान धावणारी माथेरानची महाराणी अर्थातच मिनिट्रेन ५ नोव्हेंबर पासून रुळावर येणार असल्याचे माथेरान रेल्वे स्टेशन मधून सांगण्यात आले आहे. त्यामुळे पर्यटकांना प्रतीक्षा असणारी ही सेवा उशिरा का होईना पण उपलब्ध होणार असल्याने पर्यटकांसह स्थानिकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे.



दरवर्षी पावसाळ्यात चार महिने घाटरस्त्यात अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्याची भीती असते याच कारणास्तव ही सेवा बंद करण्यात येते त्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी ही सेवा नेहमीच पूर्वपदावर येते. परंतु यावेळी बोग्यांची आसनव्यवस्था लक्षात घेऊन ५ नोव्हेंबर पासून ही गाडी रुळावर येणार असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

सद्यस्थितीत चार महिने घाटातील काही तांत्रिक बाबी तसेच रुळांची दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर करण्यात येत असून या चार महिन्यात अनेकदा मालवाहू ट्रेन नियमितपणे नेरळ वरून माथेरान स्टेशन पर्यंत ये-जा करत होती.

> **१ तारखेला मिनिट्रेन सुरू होणार असे समजले होते यासाठी आम्ही सहकुटुंब इथे आलो आहोत पण इथे अद्याप ही ट्रेन सुरू झालेली नाही. त्यामुळे मुलांच्या आनंदावर विरजण पडले आहे.**
> **– वैशाख आपटे, पर्यटक मुंबई**

मिनिट्रेन ही खऱ्या अर्थाने माथेरान करांची जीवनवाहिनी आहे.यामुळेच इथे पर्यटक येत असतात. परंतु रेल्वे प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे या नेरळ माथेरान मिनिट्रेनला विलंब लागला आहे. त्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

### किल्ले सरसगड, पारगड व पद्मदुर्गची हुबेहूब प्रतिकृती

# बच्चेकंपनीसह मोठ्यांना मातीच्या किल्ल्यांची भुरळ

**। पाली । वार्ताहर ।**

दिवाळी म्हणजे मौज, मजा आणि आनंदाचा सण आहे. डिजिटल व रेडिमेडच्या युगात देखील बच्चे कंपनीसह मोठेही किल्ले बनविण्यास पसंती देतात. बहुसंख्य गावांमध्ये अजूनही मुले व तरुण किल्ले बनवण्याच्या विधायक उपक्रमात स्वतःला गुंतवताना दिसतात.

मातीचे मावळे व प्राणी आणि महाराजांच्या मूर्ती बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या आहेत. तसेच रेडिमेड किल्ले सुद्धा विक्रीला आले आहेत. पालीतील श्री स्वामी समर्थनगर येथील हरिओम वास्तू बिल्डिंग येथे पाली नगराध्यक्षा प्रणाली शेळके व तालुका समन्वय व पुनर्विलोकन समिती सदस्य सुरेश शेळके यांच्या तर्फे सरसगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती करण्यात आली आहे. तसेच पालीतील खडकआळी येथे किल्ले पद्मदुर्ग साकारण्यात आला आहे. हा किल्ला हुबेहूब वाटत आहे. येथील पंकज बेलोसे, राज जाधव, पिंट्या बेलोसे, मंथन बेलोसे, प्रज्ञा बेलोसे यांनी किल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे. येथील कुंभारवाड्यात देखील पारगड किल्ल्याची अतिशय हुबेहूब आणि सुरेख प्रतिकृती बनवण्यात आली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत मूर्त्यांच्या किमती यंदा १० ते २० टक्क्यांनी वधारल्या आहेत. पालीतील कारागीर ज्योती कुंभार यांनी सांगितले की विक्री चांगल्या प्रकारे होत आहे. त्यामुळे समाधान आहे. स्पंदन शिंदे याने सांगितले की, शिवाजी महाराज, मावळे, विविध प्राणी यांच्या मूर्त्या किल्ल्यावर ठेवलेल्या बघायला खूप आवडते.

> **दिवाळीत दरवर्षी आवर्जून किल्ला बनवतो. यावर्षी देखील बनवला आहे. मातीचा किल्ला बनवायला खूप आवडते. किल्ला व त्यावर महाराजांची मूर्ती, मातीचे मावळे विराजमान झालेले पाहायला अभिमान वाटतो. किल्ला बनवितांना खूप मजा येते. – स्मरण विनायक जाधव, पाली**

**मातीचे किल्ले बनविण्याला पसंती** डोंगर, माळरान व शेतातून लाल किंवा काळी माती घमेल्यात किंवा पोत्यामध्ये टाकुन आणायची आणि सर्व मित्र मंडळी मिळून किल्ला बनविण्याची मज्जा काही औरच आहे. हा आनंद गाव व खेड्यातील तर काही प्रमाणात शहरातील मुले घेतांना दिसली. किल्ल्याला मावळे, सैनिक, प्राणी व रंग यांनी सजवायचे. त्यावर पाण्याचे कारंजे लावायचे. मोहरी टाकून गवत उगवायचे. रात्री किल्ल्यावर रोशनाई करायची अशा विधायक उपक्रम दिवाळीत अनेक गावातील मुलांनी केला. बच्चे कंपनीसह मोठे देखील यामध्ये सहभागी होताना दिसत आहेत.

**विविध प्रकारच्या मुर्त्या किल्ल्यावर ठेवण्यासाठी** प्लास्टिकपेक्षा मातीच्या मूर्तींना मागणी आहे. बाजारात शिवाजी महाराज व मावळ्यांच्या विविध आकाराच्या व मुद्रांच्या आणि रंगांच्या मूर्त्या उपलब्ध आहेत. याबरोबरच मातीच्या ढाल, तोफा आदि युद्ध साहित्यदेखील आहेत. शिवाय विविध देवीदेवता, प्राणी (हत्ती, वाघ, बैल इत्यादी) सुद्धा मिळत आहेत.

**मध्यम आकाराची** शिवाजी महाराजांची मातीची मूर्ती ८० ते १५० रुपयांना आहे. तर मातीचे मावळे, प्राणी २० ते ३० रुपयांपासून पुढे उपलब्ध आहेत. ठिकठिकाणी यामध्ये थोडाफार फरक आहे.

**रेडिमेडला सुद्धा मागणी** सध्या रेडिमेड किल्ल्यांनादेखील मागणी आहे. शहरात, इमारती, वसाहती आदी ठिकाणी मग हे रेडीमेड किल्ले लावले जातात. त्यावर मावळे व शिवाजी महाराजांची मूर्ती विराजमान केली जाते.

> **छत्रपती शिवाजी महाराज, मावळे व इतर मूर्तींना मागणी आहे. विक्री सुद्धा वाढली आहे. अनेकजण चांगला प्रतिसाद देत आहेत. शिवाय या मूर्त्या मातीच्या असल्यामुळे पर्यावरणपूरक आहेत.**
> **– नारायण बिरवाडकर, मूर्ती विक्रेत्या**



कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# अमेरिकेत काय होणार?

अमेरिकेचा अध्यक्ष कोण याचा फैसला येत्या आठवड्यात होईल. पाच नोव्हेंबरला तेथे मतदान आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस या दोहोंमध्ये कमालीची अटीतटी असून यांच्यापैकी कोणीही जिंकू शकेल अशी स्थिती आहे. अमेरिकेत मतदारांची सतत सर्वेक्षणे होतात. त्यांच्या आधारे कोण पुढे आहे हे समजत राहते. यंदा हा तराजू सतत वरखाली होत राहिला. आरंभी ट्रम्प पुढे होते. सध्याचे अध्यक्ष जो बायडेन हे फारच वृध्द आहेत. अमेरिका हा जगातला सर्वात श्रीमंत, शिक्षित, पुढारलेला वगैरे देश आहे. तेथील लोकशाहीदेखील आता जवळपास अडीचशे वर्षांची आहे. तरीही तेथे सत्तर-ऐशींच्या वयातले नेतेच सत्तापदी दिसतात. ट्रम्प हेदेखील ७८ वर्षांचे आहेत. त्यामुळे भारतासारख्या गरीब आणि मागास देशात हे होणे साहजिक आहे हे लक्षात घ्यायला हवे. तुलनेने युरोपात तरुण अध्यक्ष वा पंतप्रधानांची संख्या अधिक आहे. असो. बायडेन यांना सतत विस्मरण होते. माणसांची, घटनांची नावे ते चुकवतात. तरीही डेमॉक्रॅटिक पक्षाने सुरुवातीला पुन्हा त्यांनाच अध्यक्षपदाचा उमेदवार केले. पण ट्रम्प यांच्याशी झालेल्या जाहीर चर्चेच्या कार्यक्रमात बायडेन अगदीच उघडे पडले. त्यामुळे जनमत ट्रम्प यांच्या बाजूने झुकले. बायडेन यांची उमेदवारी बदला असा ओरडा झाला. मग कमला हॅरिस या सध्याच्या उपाध्यक्ष रिंगणात आल्या. हॅरिस या साठ वर्षांच्या, म्हणजे राजकारणाच्या दृष्टीने तरुण आहेत. त्यांची आई श्यामला गोपालन मूळची तामिळनाडूची. ती १९५८ मध्ये अमेरिकेत गेली. कमला यांनी कायदा, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांच्या पदव्या घेतल्या. त्यांनी सरकारात एटर्नी म्हणून काम केले व तिथूनच त्या राजकारणात शिरल्या. ट्रम्प हे २०१६ ते २०२० या काळात राष्ट्राध्यक्ष राहिलेले आहेत. २०२० मध्ये ते हरले त्यावेळी त्यांची लोकप्रियता अगदी खाली गेली होती. ते पुन्हा अध्यक्षपदाच्या शर्यतीत येतील असे कोणालाही वाटले नव्हते. पण आता ते केवळ शर्यतीतच नव्हे तर अध्यक्षही होऊ शकतात अशा बेतात आहेत.

## ट्रम्प यांची गुंडगिरी

ट्रम्प हे सरळसरळ भ्रष्टाचारी आणि गुन्हेगारी मनोवृत्तीचे नेते आहेत. पूर्वी त्यांचे काही महिलांशी अनैतिक संबंध होते. त्यांची वाच्यता होऊ नये म्हणून त्यांनी या महिलांना पैसे दिले. त्याबाबतचा एक गुन्हा त्यांच्याविरुध्द चालू आहे. अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांनी काही मूठभर उद्योगपतींना फायदेशीर ठरेल अशी धोरणे आखली. मुळात ते पहिल्यांदा निवडून आले तेव्हा मतदारांचा डिजिटल खासगी डेटा वापरून त्यांच्यावर खोट्या प्रचाराचा मारा करण्यात आला असा आरोप झाला होता. नंतर २०२० मध्ये आपण हरणार हे लक्षात आल्यावर त्यांनी मतदानात भानगडी करण्याचा प्रयत्न केला. ते जमले नाही तेव्हा त्यांच्या समर्थक गुंडांनी वॉशिंग्टनमधील कॅपिटॉल या संसदेच्या इमारतीवर हल्ला चढवला व तेथे चालू असलेली मतमोजणी रोखण्याचा प्रयत्न केला. याला ट्रम्प यांची फूस होती. शेकडो जणांना याबाबत शिक्षा झाली आहे. ट्रम्प यांच्यावरच्या आरोपांवरचा फैसला मात्र निवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आला आहे. हा सर्व आपल्याविरुध्दचा बनाव आहे असे ट्रम्प यांचा कांगावा आहे. पण त्यांची तेव्हाची व नंतरची वर्तणूक एखाद्या गुंड टोळीच्या डॉनसारखीच आहे. आताही आपल्याविरुध्द खटला भरणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि टीका करणाऱ्या पत्रकारांना अध्यक्ष झालो की आपण धडा शिकवू अशी जाहीर धमकी ते देत आहेत. इतके सर्व असूनही ट्रम्प यांना अमेरिकेतील सुशिक्षित जनता पाठिंबा देत आहे. याचे कारण ट्रम्प स्वतःला खरे देशभक्त म्हणवतात. अमेरिकेची सध्याची स्थिती वाईट असून आपल्याला अमेरिकेला पुन्हा जगात श्रेष्ठ करायचे आहे असा त्यांचा नारा आहे. तो भयंकर लोकप्रिय आहे. आपण जगाच्या मागे पडत असून चीन, भारत इत्यादी देश कुरघोडी करीत आहेत अशी भीती ट्रम्प सतत निर्माण करतात व अमेरिकी लोक त्याला बळी पडतात हे थक्क करणारे वाटले तरी आजचे जिवंत वास्तव आहे.

## खोटा प्रचार

गेल्या म्हणजे २०२० च्या निवडणुकीत अमेरिकेतील सर्व पत्रकार, विद्यार्थी, चळवळे लोक ट्रम्प यांच्या विरोधात होते. पण गेल्या चार वर्षात ट्रम्प यांनी चिकाटीने बाजू उलटवली आहे. आजही हॅरिस यांना बहुतांश प्रागतिक व विचारी लोकांचा तसेच पत्रकारांचा पाठिंबा असला तरी कमी शिकलेले, तासाला इतके डॉलर या हिशेबाने काम करणारे कामगार इत्यादी ट्रम्प यांच्या मागे आहेत. शिवाय, अमेरिकेत मेक्सिको, भारत, चीन इत्यादी देशांमधून प्रचंड प्रमाणात बेकायदा लोक घुसत आहेत असा प्रचार ट्रम्प यांनी चालवला आहे. या बेकायदा घुसखोरांना मतदानाला हॅरिस यांचा पक्ष परवानगी आहे किंवा अनेक अमेरिकी लोक दोन-दोनदा बनावट मतदान करीत आहेत असा तद्दन खोटा प्रचार ट्रम्प यांनी चालवला आहे. यंदाच्या आपल्या लोकसभा निवडणुकीत, राहुल गांधी तुमची संपत्ती काढून अतिरेक्यांना आणि बेकायदा नागरिकांना देणार असल्याचा प्रचार नरेंद्र मोदींनी केला होता. राहुल हे मुस्लिम समाजाची धन करणार आहेत असा त्यातला गर्भितार्थ होता. तसलाच घाणेरडा प्रकार तिकडे ट्रम्प करीत आहेत. म्हणूनच ट्रम्प आणि मोदी यांचे चांगले जमते. २०२० मध्ये अगली बार ट्रम्प सरकार अशी घोषणा मोदींनी अमेरिकेतल्या भारतीय लोकांच्या मेळाव्यात केली होती. त्यावेळी ते तोंडावर आपटले होते. त्यामुळे यावेळी मोदींनी सावधगिरी बाळगली आहे. शिवाय ट्रम्प सध्या भारतावर टीका करीत आहेत. अमेरिकी वस्तूंवर भारत प्रचंड कर लादत असल्याचा आरोप करीत आहेत. त्यामुळे मोदींची अडचण आहे. पण उद्या ते सत्तेत आलेच तर या दोन स्वतःच्याच प्रेमात असलेल्या आणि सत्तेसाठी कोणत्याही थराला जाणाऱ्या दोन नेत्यांचे जमायला वेळ लागणार नाही. हॅरिस यांनी ट्रम्प यांना चांगली टक्कर दिली आहे. ट्रम्प यांच्या गुंडगिरीवर त्या थेट हल्ला चढवत आहेत. त्या सत्तेत आल्या तर काळ्या समाजातल्या आणि महिला अशा त्या पहिल्याच राष्ट्राध्यक्ष होतील. ही संधी त्यांना अमेरिकी देतात का हे पाहावे लागेल.

विचार

# चर्चा माघारीची, परिक्षा दक्षतेची

**भारत आणि चीनमधील मतभेद कमी झाले आहेत. कुटनीतीच्या भाषेत याचा अर्थ प्रगती असा होतो. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आपल्या ताज्या निवेदनात म्हटले आहे की, सीमेवरील ताज्या सैन्यपरतीमुळे संबंधांमधील ७५ टक्के समस्या सोडवण्यात आल्या आहेत; परंतु प्रत्यक्षात झालेल्या प्रगतीची तपासणी करणे आवश्यक आहे. या विषयातले तज्ज्ञही चीनच्या माघारीकडे विश्वासाने पहायला तयार नाहीत.**



आरिफ खान

अलीकडच्या काळात भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये काही प्रमाणात सुधारणा दिसून आली आहे; परंतु या आशावादाला जास्त महत्व दिले जाऊ नये, अशी देशांतर्गत प्रतिक्रिया आहे. दोन्ही देशांमधील संबंधांबद्दलच्या अहवालांवरून सूचित होते की भारत आणि चीनमधील मतभेद कमी झाले आहेत. कुटनीतीच्या भाषेत याचा अर्थ प्रगती असा होतो. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आपल्या ताज्या निवेदनात म्हटले आहे की, डिसएंगेजमेंटशी संबंधित ७५ टक्के समस्या सोडवण्यात आल्या आहेत; परंतु प्रत्यक्षात झालेल्या प्रगतीची तपासणी करणे आवश्यक आहे. चीनने एप्रिल २०२० पूर्वीच्या तैनाती किंवा छावणीपर्यंत आपले सर्व सैन्य माघारी घ्यायला सुरुवात झाली असली, तरी ते अजून पूर्णपणे गेलेले नाही. दोन्ही देशांसाठी गस्त घालण्याचे अधिकार पुनर्संचयित केले गेले पाहिजेत. १९९३ आणि १९९६ च्या करारांचा आदर केला पाहिजे. १९९३ मधील करारानुसार दोन्ही देशांनी कोणत्या अटींवर सीमा व्यवस्थापनाचे काम करायचे, हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. १९९३ चा करार दोन्ही बाजूंना प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या त्यांच्या समजुतीनुसार लष्करी गस्त घालण्याची परवानगी देतो. मात्र याबाबत काही अडचण आल्यास दोन्ही बाजूंनी तेथे तोडगा काढून आपले सैन्य मागे घेतले पाहिजे. सीमारेषेवर काही मतभेद उद्भवल्यास दोन्ही बाजूंनी संयुक्त संवादाद्वारे सोडवले पाहिजेत, असेही त्यात नमूद करण्यात आले होते.

१९९३ च्या करारानुसार कोणताही पक्ष बळाचा वापर करण्याची धमकी देऊ शकत नाही. त्यानंतर १९९६ मध्ये भारत आणि चीन यांच्यात आणखी एक करार झाला. त्यात बारा कलमे आहेत. प्रत्येक कलम एका विशिष्ट विषयाशी संबंधित आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही बाजूची क्षमता दुसऱ्या बाजूच्या विरोधात वापरली जाऊ नये. त्यात अशी तरतूद होती की एक बाजू ब्रिगेडच्या आकाराचे सैन्य घेऊन प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ लष्करी सराव करते, तेव्हा दुसऱ्या बाजूच्या ब्रिगेडच्या आकाराच्या सैन्याला कळवावे लागते. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या पलीकडे हवाई घुसखोरी करण्यासही बंदी आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून दोन किलोमीटरच्या आत कोणतीही शस्त्रे किंवा स्फोटके वापरली जाऊ शकत नाहीत. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या जवळ मोठे सैन्य तैनात करता येत नाही. केवळ थोड्या गस्तीला परवानगी आहे. एप्रिल-मे २०२० मध्ये चीनने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या भारतीय बाजूला अवजड उपकरणांसह मोठ्या संख्येने सैन्य तैनात केले, तेव्हा याचे उल्लंघन झाले. १९९३ च्या करारानुसार, कोणताही पक्ष बळाचा वापर करण्याची धमकी देऊ शकत नाही. चीनने यथास्थिती पुनर्संचयित केली, १९९३ आणि १९९६ च्या करारांचा आदर केला आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील पूर्वीच्या स्थितीकडे परत गेले, तर तो चीनविरुद्ध भारताचा मोठा विजय ठरेल. याचा अर्थ असा की पूर्व लडाखमधील वादाच्या पाच बिंदूंवर चीन ज्या गोष्टी बळजबरीने करण्याचा प्रयत्न करत होता, त्याविरूद्ध भारताचा प्रतिदबाव उपयुक्त ठरला. देपसांग बल्ज, गोगरा-हॉट स्प्रिंग्स, गलवान, पँगोंग त्सो आणि डेमचोकचे दक्षिणेकडील क्षेत्र आणि उत्तरेकडील किनारा हे पाच वादग्रस्त भाग आहेत.

एप्रिल २०२० पूर्वीची परिस्थिती येथे पूर्ववत झाल्यास त्याची तुलना पाकिस्तानविरुद्धच्या कारगिल विजयाशी केली जाऊ शकते. चीनने इतक्या मोठ्या प्रमाणावर आपल्या भूमिकेपासून माघार घेतली, तर त्याचे परिणाम दिसून येतील, हे निश्चित आहे. याचा अर्थ शी जिनपिंग आणि त्यांच्या निष्ठावंत सैनिकांच्या गटासाठी ही लाजिरवाणी बाब ठरेल. यामुळे देशांतर्गत आघाडीवर शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखालील राजवटीची राजकीय स्थिती कमकुवत होण्याचीही शक्यता आहे. यथास्थिती पुनर्संचयित केल्याने त्यांची आधीच असलेली नाजूक स्थिती आणखी कमकुवत होणार आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिमेवर परिणाम होईल. याचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे चिनी कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष आणि नेते म्हणून शी जिनपिंग यांचे पक्षांतर्गत वजन कमी होईल. शी जिनपिंग हे संभाव्य नुकसान चांगल्या प्रकारे टाळू शकतात. कारण चीनच्या प्रशासनावर त्यांची मजबूत पकड आहे. जिनपिंग यांनी एक दशकाहून अधिक काळ चीनवर राज्य केले आहे. प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी स्वतःला सामर्थ्यवान बनवले आहे, तरीही ही परिस्थिती किंवा निकाल भारतासाठी खूप मोठी गोष्ट असेल. कारण यामुळे भारताच्या मुत्सद्देगिरीचा मोठा विजय होईल. एकंदरीत, चीनची माघारी आणि सीमेवरील तणाव शांत होणे, ही एक स्वागतार्ह बाब आहे आणि ब्रिक्स परिषदेतील भरत आणि चीनच्या प्रमुखांच्या भेटींनंतर या शक्यतेवर शिक्कामोर्तब होणे ही एक महत्वपूर्ण घडामोड आहे. मात्र याला एक दुसरी बाजुही आहे. ती समजून घ्यायला हवी.

ज्येष्ठ लष्करी अधिकारी दत्तात्रय शेकटकर चीनच्या माघारीबद्दल साशंक दिसतात. त्यांच्या मते चीन माघार घेत असल्याचे कितीही दावे करत असला तरी भारताने सावध असले पाहिजे. ते म्हणतात, चीन परतीबद्दल सांगत असला, तरी तो किती मागे गेला हे तपासायला हवे. गलवान खोऱ्यात आक्रमण करण्यापूर्वी चीन नेमका कुठे होता आणि सध्या कुठे आहे आणि माघार घेतल्यानंतर तो कुठे असेल या प्रश्नांची उत्तरे शोधली तरच आपल्याला चीनच्या माघारीचा अर्थ उमगू शकेल. म्हणूनच चीन मागे गेला, या म्हणण्याला सध्या तरी तसा काही अर्थ नाही आणि त्याची कथने वस्तुस्थितीला धरून नाहीत. चीन हा विश्वास ठेवण्याच्या लायकीचा देश नाही. चीनला १४ राष्ट्रांच्या सीमा लागून आहेत. त्यापैकी एकही राष्ट्र असे नाही, ज्याचे चीनशी वाद नाहीत. मांचुरिया, मंगोलिया, तैवान, हाँगकाँग अशा राष्ट्रांची उदाहरणे घेतली, तर आपल्याला चीनची आक्रमक वृत्ती आणि त्यांनी अन्य ठिकाणी बळकवलेली जमीन याची खात्री पटू शकेल. हीच स्थिती भारताबाबतही आहे. भारत शक्तीशाली होऊन दोन हात करणार नाही, तोपर्यंत चीन माघार घेणार नाही हे वास्तव आहे. चीन टेबलवर करत असलेल्या वाटाघाटी केवळ वेळ काढण्यासाठी असतात. त्यातून प्रत्यक्षात हाती काही लागत नाही. बर्फ पडतो आणि उणे तीस अंशापेक्षा जास्त थंडी असते, तिथे आपले सैन्य लढत असते आणि आपण इकडे बसून चीनच्या माघारीची चर्चा करत असतो. यातला फरक लक्षात घेतला पाहिजे. गेल्या चार वर्षांमध्ये चीनने भारताच्या भूमीलगत भूमिगत लष्करी तळ, हवाई अड्डे बनवले आहेत. ते काही माघार घेण्यासाठी नाहीत. त्यामुळे भारताने गाफील राहून चालणार नाही.

निवृत्त लेफ्टनंट जनरल शेकटकर पुढे सांगतात की, गेल्या ६५ वर्षांचा अनुभव लक्षात घेता चीनची वेळकाढू धोरणे आपल्याला माहित आहेत. त्यामुळे परराष्ट्र मंत्रालय, सैन्यदल यांनी गाफील राहता कामा नये. रशिया हा चीनचा अतिशय जवळचा मित्र असतानाही त्याची पाच हजार आठशे वर्ग किलोमीटर जमीन चीनच्या ताब्यात आहे, तर भारताची ३२ हजार वर्ग किलोमीटर जमीन चीनने गिळंकृत केली आहे. उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश येथिल सीमांवर चीनने घुसखोरी केली आहे. भारताच्या उत्तर सीमेवर कब्जा केला आहे. नेपाळच्या सीमेवर चीन आला आहे. तिथेही अतिक्रमण सुरू आहे. भूतान हे भारताचे मित्र राष्ट्र आहे. त्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे. मात्र तिथेही चीनने घुसखोरी करून भारतावर दबाव टाकायला सुरुवात केली आहे. डोकलाम हे त्याचे उदाहरण. पाकिस्तानबरोबर संबंध नीट ठेवा, अशी एक प्रकारची धमकी चीन आपल्याला देत आहे. पाकिस्तानबरोबर आपले संबंध नीट राहणार नाहीत हे जगजाहीर आहे. बलुचिस्तानमध्ये चीनने ग्वादर बंदर उभारले आहे. तिथून चीनची मोठ्या प्रमाणात आयात निर्यात होते. काराकोरम आणि गलवान ताब्यात घेतले तर पाकिस्तानला जाण्याचा मार्ग आणखी मोकळा होईल, असे चीनला वाटते. त्यामुळे चीन कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही. परिणामी, आपण चीनशी दोन हात करण्याची तयारी कायम ठेवली पाहिजे.

आजकाल

# ते साधं आणि गर्दी नसलेलं पुणं होतं

हेमंत देसाई

लहानपणी पुण्यात वाड्यात राहत असताना, दिवाळीत आम्ही किल्ला करायचो आणि 'या या या, येथे आमचा प्रेक्षणीय किल्ला आहे, तो बघायला जरूर या' असे येणाऱ्या-जाणाऱ्यांना आवाहन करायचो. वाड्यात माती सहजपणे मिळायची. गरज पडतील, तेवढे दगडही उपलब्ध व्हायचे. विटा असायच्या. तुळशीबागेतून छत्रपती शिवाजी महाराज यांची तसेच सैनिकांच्या मूर्ती आणायच्या. डोंगरावर मोहरी पेरायची आणि मग हिरवळ उगवायची. किल्ल्याबाहेरच्या नदीच्या पाण्यातून नौका जातेय, असा सीन निर्माण करायचो... वाड्यातले आणि बाहेरचे लोक किल्ल्याचे कौतुक करत, तेव्हा धन्य धन्य वाटायचे... माडीवरच्या खोलीत दोन बाजूला चादरी टांगायच्या आणि आणि लाकडाच्या खोट्या बंदुका व पुठ्ठ्याची काडुतसे घेऊन लुटूपुटूचे युद्ध खेळायचो... दिवाळीच्या पहिल्या दिवशी साडेतीन-चारला उठून पहिली आंघोळ करायची.

भावंडांमध्ये पहिल्यांदा कोण उठणार, याची स्पर्धा असे..मग बंब लावायचा, चिमणीतून धूर बाहेर आला की पाच-दहा मिनिटे ज्वाळांच्या आसपास हात एकमेकांवर घासत, कुडकुडणाऱ्या थंडीत उब शोधायची... आईकडून उटणे- तेल लावून घ्यायचे आणि सुवासिक साबणाने मस्त आंघोळ करायची! वर्षातून एकदाच मिळणारे नवे कपडे घालायचे आणि फटाक्यांच्या माळाच्या माळा लावायच्या. रस्त्यावरून जाणाऱ्या एखाद्या म्हाताऱ्याच्या जवळ लवंगीची माळ लावून, त्याला घाबरवून सोडायचे नि खिदळायचे... रेडीमेड नव्हे, तर शंभर टक्के घरी बनवलेला पहिला फराळ (दिवाळीआधी आई घरात बनवताना शेव, शंकरपाळ्या बनवत असताना, एखादी शंकरपाळी वा थोडीशी शेव तोंडात टाकायची) झाला, की एसपी कॉलेजवर क्रिकेट खेळायला जायचे. नंतर 'लोकमान्य' वाचनालयातून अर्नाळकर, काशीकर यांच्या रहस्यमय कादंबऱ्या किंवा पुलं, ग ल ठोकळ, व्यंकटेश माडगूळकर वाचायचो. पेरूगेटसमोरच्या आपल्या रेडिओच्या दुकानात कुर्ता पायजम्यातले नि तोंडात पान असलेले अव्वल कथालेखक दि बा मोकाशी, रेडिओ दुरुस्ती करत असताना दिसायचे. त्यांच्या दुकानात कधी श्री ज जोशी, तर कधी विद्याधर पुंडलिक यांना पाहायचो. कधी चित्तरंजन कोल्हटकरही येऊन बसायचचे.

दुरून या सगळ्यांना पाहताना, ते एकमेकांशी काय बोलत असतील, असे कुतूहल मनात दाटून यायचे... नंतर भरत नाट्य मंदिराच्या बाहेर नवीन नाटकांच्या पाट्या वाचत बसायचो. सायकलवरून मंडईत जायचो आणि झेंडूच्या फुलांनी सजलेले गाळे आणि दुकाने पाहायचो. दिवाळीत पहिल्या दिवशी गोडधोड खाऊन, मग दुपारी बुद्धिबळ खेळायचे किंवा व्यापार! आणि दुपारी त्या काळात पुण्यात गावात म्हणजे सदाशिव, नारायण, शनिवारात शांतपणा मिळायचा. देवळांमधून बायकांची भजने ऐकू घ्यायची आणि खूप मस्त वाटायचं! त्या काळात सोडियम व्हेपरचा प्रकाश नसल्यामुळे, दिवाळीची आरास अधिक मनात ठसत असे. त्यानंतर टिळक रोडवर किंवा लक्ष्मी रोडवर जाऊन दिवाळी अंक चाळायचो. काही आवडलेले दिवाळी अंक खरेदी करायचो आणि कथा, वैचारिक लेख वाचायचो. रात्री जागून जागून वाचन करायचे. संध्याकाळी फटाके वाजले, की फटाक्यांचा धूर आणि त्याचा वास मला प्रचंड आवडत असे. 'प्रदूषण' हा शब्द देखील तेव्हा ऐकला नव्हता. कारण भवतालात तसे प्रदूषण नव्हतेच. मी शाळेत असतानाच बालगंधर्व रंगमंदिर तयार झाले आणि मग तिथे जाऊन नव्या नाटकाच्या पाट्या पाहत बसायचो. विजय, भानुविलास, अलका, डेक्कनमध्ये शिरून तिथल्या शोकेसमध्ये आगामी चित्रपटांचे शोकार्ड्स व फोटो मांडलेले असत, ते पाहत बसायचा मला नाद होता. मनात आले की, तळ्यातल्या गणपतीपाशी जाऊन बसायचो. किंवा पळत पळत पर्वती चढायची आणि मागच्या डोंगरावर किंवा हनुमान टेकडीला जायचे.. आणि तिथे शांतपणे बसून राहायचे... दिवाळीची तीन आठवड्यांची सुट्टी अशी जात असे.. आमच्याकडे एक शिंपी येत असे.

तो सगळ्या भावंडांची मापे घेऊन एका ताग्यात आमचे कपडे शिवत असे. दिवाळीत वाडे स्वच्छ केले जात. रांगोळ्या काढल्या जात आणि साधे आकाशकंदील घरच्या घरी तयार करून लावण्याची पद्धत होती. रेडिओवर मालती पांडे, माणिक वर्मा, भीमसेन, कुमार यांची गाणी लागलेली असत. रस्त्यावरून जाता येताना ती ऐकू यायची नि खूपच मस्त वाटायचे.. क्षणाक्षणाला आणि फुटाफुटाला स्वतःचेच फोटो काढून आणि सोशल मीडियावर टाकून 'सेलिब्रिटी' बनण्याचा कोणाला सोस नव्हता. कारण ती माध्यमेच नसल्यामुळे, तसली चटक लागण्याचा संभवच नव्हता! लोकांचे सेलिब्रिटीकरण होण्याच्या अगोदर नॉर्मल माणसे नॉर्मल माणसासारखी जगत होती. पूर्वीच्या काळातील काही गोष्टी मला आवडतात. त्यामध्ये साधेपणा आणि प्रदूषणविरहित, गर्दीविरहित, स्पर्धाविरहित असा जगण्यातला शांतपणा, हा मला आवडणारा सगळ्यात महत्त्वाचा भाग!

लोकसंसद

## सण-उत्सवाला द्या मातृभाषेतून शुभेच्छा !

एका प्रथितयश वृत्तवाहिनीने एक खास बातमीपर कार्यक्रम आयोजित केला होता, की सर्वांनी 'शुभ दीपावली' म्हणूनच शुभेच्छा द्या तसेच अनेक सामाजिक संकेतस्थळावर सुद्धा अशा प्रकारच्या बातम्या वाचून मन थोडे थबकलेच !

एकीकडे राज्य सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला तर दुसरीकडे आपण आपल्याच सणांना शुभेच्छा देताना तिचा कमी वापर करतो. ज्या मायमराठीने आपल्याला बालपणी खूप साथ दिली आहे. आपण जेव्हा रडलो तेव्हा आईने, पडलो तेव्हा बाबांनी आणि धडपडलो तेव्हा गुरुजींनी सांभाळून पुढे नेले. आपण आणि आपल्या या मार्गदर्शकामध्ये दुवा होती, ती मराठी भाषा! ज्या मातृभाषेने आपले जीवन समृद्ध बनवले, तिलाच कमी लेखणे हे तिच्याप्रति कृतघ्नपणा दाखविण्यासारखे नाही का ? हळूहळू मराठी शाळा-विद्यालये कमी होत आहेत. कॉन्व्हेंटमध्ये शिकणारी सर्व पिढी मराठी भाषा विसरत चालली आहे. सरकारने त्यांचे काम थोडे बहुत केले आहे. आता आपल्या सर्वांना ते पुढे घेऊन जायचे आहे. हैप्पी दिवाली, हैप्पी नवरात्री असे म्हणणे टाळून या पुढील प्रत्येक सणांना 'शुभ दीपावली', 'शुभ पाडवा' असे म्हणूया आणि मायमराठीला जिवंत ठेवूया !

**श्री. आल्हाद माळगांवकर पनवेल**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**४ नोव्हेंबर**

१९००: के.स.री या टोपणनावाने काव्यलेखन करणारे कवी केशव सदाशिव रिसबुड यांचे निधन.वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी अंधत्व आल्याने लेखणीला विश्रांती. तत्पूर्वी काव्यरत्नावलीतून त्यांच्या ८५६ कविता प्रसिध्द याशिवाय व्यवहारपद्य सहस्त्र', 'सुधारकवारणांकुशा', 'प्रभुलीला शती' ही काव्ये. 'केकावली' हे खंडकाव्य आणि आपल्या बंधूची अपूर्ण कादंबरी 'वसंतकोकिळा' ही पूर्ण केली. **१९११** : जागतिक कीर्तीचे प्राच्यविद्या संशोधक व पाली, सिंहली, ब्रह्मी, थाई या भाषा अवगत करुन घेऊन त्या भाषांतील मूळ साधनांनिशी संशोधन करून सुमारे १४० शोधनिबंध लिहिणारे विद्वान डॉ. पुरुषोत्तम विश्वनाथ बापट यांचे निधन. **१९२०**:-ख्यातनाम इतिहासकार, वृत्तपत्रकार सदाशिव मार्तंड गर्गे यांचा जन्म नागपूरच्या दै. तरुण भारत तसेच पुण्याच्या दै. सकाळचे काही काळ सहसंपादक असणाऱ्या गर्गे यांनी विविध वृत्तपत्रातून राजकारण, अर्थव्यवस्था, पंचायत राज या विषयावर लेखन केले. याखेरीज करवीर रिसायत, भारतीय समाजविज्ञान कशाचे सहा खंड, मराठी मुसलमानी व ब्रिटिश रिसायतींच्या बारा खंडांचे संपादन तसेच भारतीय राज्यघटनेचा इतिहास, राज्यशास्त्राचा विकास, सुलभ राज्यशास्त्र, समाजवादी समाज रचना आणि कोल्हापूरच्या घराण्याचा इतिहास सांगणारे राजाज्ञांचे घराणे अशी साहित्य संपदा प्रकाशित. लेखक चंद्रकांत महादेव बांदिवडेकर यांचा जन्म. हिंदी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या बांदिवडेकरांनी हिंदीतून विपूल प्रमाणात लेखन केले. याशिवाय 'मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा', 'प्रेमचंद : व्यक्ति आणि वाङ्मय', 'मराठी कादंबरीचा इतिहास', 'निज भाषा उन्नति स्वभाषेतच खरी प्रगति' देशी वाण' 'साहित्याचे मर्म शोध आणि बोध याशिवाय दोन संपादित ग्रंथ मराठीतून हिंदीत ७ अनुवादित ग्रंथ' हिंदी विषयातून १२ ग्रंथ आणि २५० अधिक लेख विविध वृत्तपत्रातून प्रसिध्द. **१९३३** :- कथा, कादंबरीकार, संपादक, समीक्षक भीमराव बळवंत कुळकर्णी यांचा जन्म. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रासह वाङ्मय रसास्वाद हा टीकालेख संग्रह तसेच 'हरिनारायण' ही हरिभाऊंच्या जीवना-वरील कादंबरी 'अच्युत बळवंत कोल्हटकर वाङ्मय दर्शन', 'भाऊसाहेबांची बखर', 'श्री शिवछत्रपती सप्त प्रकरणात्मक चरित्र बखर', 'वामन पंडितांची सुधाकाव्य' ही महत्त्वपूर्ण संपादने त्यांच्या नावावर आहे. 'मराठी फार्स' आणि 'मराठी वाङ्मय चर्चा आणि चिकित्सा' हा समीक्षा ग्रंथ त्यांचा विशेष उल्लेखनीय आहे. याशिवाय 'संगीत सौभद्र', 'आमचे जीवन आमच्या स्मृती', 'मराठी गद्याचा पूर्व रंग', 'शास्त्रीय मराठी व्याकरण' ही अन्य मराठी ग्रंथ संपदा. **१९३९** :- लेखिका मोहना मार्डीकर यांचा जन्म. 'केशरसांज' हा काव्यसंग्रह, 'मनाचिये गुंती' हे ललित आणि 'संगीतशास्त्र परिचय' अशी ग्रंथ संपदा लेखिका संगीत या विषयाच्या जाणकार असून या विषयावर लेखन केले आहे. **१९४०** :- विविध नियतकालिकांतून लेखा, कथा, कविता, पर्यटन आदी विषयांवर लिहिणारे लेखक रविंद्र यशवंत साने यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'महाराष्ट्र पर्यटन कोश' तसेच 'कोकणदर्शन' या पुस्तकातून कोकणातील ६९ प्रेक्षणीय स्थळांची सचित्र माहिती. याशिवाय महाराष्ट्र ३७४ प्रसिध्द असद पर्यटनस्थळांची माहिती असलेल्या पुस्तकांखेरीज 'भारतीय युध्दाचे वर्ष', 'लेखनमित्र' हे मराठी व्याकरणातील पुस्तक अशी साहित्य संपदा. **१९४३** :- लेखक प्राचार्य डॉ. श्रीपाद विनायक कडवेकर यांचा जन्म. ह्यांनी 'कंपनी चिटणीसाची कार्यपध्दती', 'विघटन तत्त्वे आणि पध्दती', 'व्यवसाय संघटन' अशी पुस्तके लिहून मराठी साहित्यातील वाणिज्य विषयक दालन समृध्द केले. **१९४४**:- बालसाहित्यिक आणि विविध नियतकालिकातून लेखन करणारे विलास रुधिर कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांचा 'चतुर मुलाची चौथी रेषा आणि इतर गोष्टी' हे बालसाहित्य प्रकाशित झाले आहे. **१९५५** :- लेखिका अंजली अरुण पांडे यांचा जन्म. 'ओंजळ' हा काव्यसंग्रह, 'अबोली' हा कथासंग्रह आणि 'संत मीराबाईचे चरित्र' हे बालसाहित्य अशी साहित्य संपदा. **१९५५** :- प्राचार्य डॉ. सत्यवान मेश्राम यांचा जन्म. ह्यांचा 'संत गाडगेबाबा', 'काळ आणि कर्तृत्व' हा समीक्षात्मक ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९९१** - जगविख्यात प्राच्यविद्यासंशोधक, पाली भाषेचे जाणकार डॉ. पुरुषोत्तम विश्वनाथ बापट यांचे निधन. 'सिंहली, ब्राम्ही, थाई' या भाषांचे जाणकार असणाऱ्या बापटांनी अनेक शोधनिबंध लिहिले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ नोव्हेंबर

१)रविद्र गजानन लोंढे
विद्यानगर अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्री. संजय मधुकर पाटील, वाढदिवस अलिबाग**

# ग्रामीण भागात शेतकऱ्यांची केविलवाणी धडपड

**। मोखाडा । प्रतिनिधी ।**

**पालघर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यात ऑक्टोबर अखेर पर्यंत परतीचा आणि अवकाळी पाऊस कोसळला आहे. त्यामुळे कापणीला आलेले ऊभे पीक शेतातच आडवे झाले आहे. तर शेतात कापुन वाळवत ठेवलेले पीक पाण्यावर तरंगल्याने, शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रु तरळले आहे. असे असतानाही ऐन दिवाळी सणात ऊरले, सुरलेले पीक गोळावण्यासाठी शेतकऱ्यांची केविलवाणी धडपड सुरू आहे. आपल्या नाही तर आपल्या जित्राबांची भुख भागवण्यासाठी शेतकरी ही धडपड करत आहेत.**



विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे विविध राजकीय पक्षांचे तसेच अपक्ष ऊमेदवार, दिवाळी सणाचे औचित्य साधून शुभेच्छा देऊन, समाज माध्यमातून आपली प्रचार यंत्रणा राबवित आहे. मात्र, पालघर आदिवासी ग्रामीण भागातील तालुक्यांमध्ये ऑक्टोबर अखेरपर्यंत परतीचा आणि अवकाळी पाऊस कोसळला आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाणार असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. ऊरले सुरलेले पीक गोळावण्यासाठी शेतकऱ्यांनी ऐन दिवाळी सणात धडपड सुरू केली आहे.

आपल्या हाती भिजलेल्या आणि कुजण्याच्या स्थितीत असलेल्या स्थितीतील पिकातुन काहीही हाती लागणार नाही. याची जाणीव जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, तलासरी आणि डहाणू या तालुक्यातील शेतकर्यांना झाली आहे. मात्र, भाताचा पेंढा गोळा करून तो आपल्या जनावरांची भुख भागवेल, एव्हढी जाणीव ठेवुन शेतकऱ्यांनी शेतातील पीकाची गोळावळी सुरू केली आहे. परतीच्या पावसाने आपल्या तोंडातील घास हिरावुन घेतला आहे. मात्र, आपल्या कामधेनुंना जगवण्यासाठी, खराब झालेल्या पीकांचा पेंढा गोळावण्याची धडपड शेतकरी करत आहेत.

अतिदुर्गम मोखाडा तालुक्यात वर्षभरात एकमेव केवळ खरीपाचे च पीक घेतले जाते. या पीकाच्या ऊत्पन्नावर येथील शेतकऱ्यांना, वर्षभर आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो आहे. तालुक्यात खरीपाचे १२हजार ७५९ हेक्टर क्षेत्र आहे. यामध्ये नागली ४ हजार ३२२ , वरई ३ हजार ८८५ आणि भाताचे २ हजार१५ या मुख्य नगदी तृणधान्य पीकाचे १० हजार २२३ हेक्टर क्षेत्र आहे. त्या खालोखाल उडीद, कुळीद, तुरं या कडधान्याचे १ हजार ७८८ हेक्टर क्षेत्र आहे. तर भुईमूग, सुर्यफुल, खुरासणी आणि तिळ या गळीत धान्याचे ७४७ हेक्टर क्षेत्रावर मोखाड्यात यंदाच्या पावसाळ्यात शेती करण्यात आली आहे. मात्र, यंदा भरघोस आलेले पीक, परतीच्या पावसाने हिरावल्याने, शेतकऱ्यांचा दिवाळी सणं संकटातच गेला आहे.

ऑक्टोबर अखेरपर्यंत पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाऊस कोसळला आहे. सरकारी यंत्रणेने शेतीच्या नुकसानीची पाहणी करून पंचनामे केले आहेत. मात्र, या परतीच्या पावसाने शेतकर्यांच्या घरात खरीपाचे धान्य घरात आले नाही. या नवीन धाण्याची पुजा धनत्रयोदशीला करता आली नाही, याची खंत शेतकऱ्यांना आहे. प्रशासनाने शेतपीकाचे नुकसान प्रत्यक्ष पाहिले आहे. मात्र, ऐन दिवाळी सणाला शेतकरी नुकसान भरपाईच्या लाभापासुन वंचित राहिला आहे. त्याच्या पदरी निराशा आली आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे सरकारची यंत्रणा व राजकीय पक्ष व नेते निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत. त्यातच निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे सरकार ला कोणतेही निर्णय घेता येत नाही. त्याचा मोठा फटका ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बसला आहे.

> दिवाळी सणं असो की निवडणुका आपल्या कुटूंबाची वर्षभर गुजराण कशी होईल याची चिंता शेतकर्यांना आहे. परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. शेतकर्यांच्या पदरी भिजलेले पीक पडणार नाही. मात्र, आपल्या जणावरांचे पोट भरण्यासाठी शेतकरी धडपड करत आहेत. नुकसानीची भरपाई कधी मिळेल, याची आशा लागुन राहिली आहे.
>
> विष्णू हमरे, शेतकरी मोखाडा.

## राजापुरातील निकाल महिलांच्या हाती

**। राजापूर । वार्ताहर ।**

राजापूर विधानसभा मतदारसंघामध्ये २ लाख ३८ हजार ४०९ मतदार असून त्यामध्ये १ लाख २४ हजार ५७० महिला आणि १ लाख १३ हजार ८३९ पुरुष मतदारांचा समावेश आहे. महिला-पुरुष मतदारांचा विचार करता पुरुष मतदारांच्या तुलनेमध्ये महिला मतदारांची १०५७० एवढी जास्त मतदारसंख्या आहे. त्यामुळे राजापूर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक आखाड्यातील उमेदवारांचे भवितव्य सावित्रीच्या लेकींच्या हातामध्ये राहणार आहे.

## ‘शिटी’साठी ‘बविआ’ची उच्च न्यायालयात धाव

**। पालघर । वार्ताहर ।**

भारत निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी शिटी हे निवडणूक चिन्ह जनता दल (युनायटेड) पक्षासाठी राखीव ठेवल्याने बहुजन विकास आघाडीने उच्च न्यायालयात त्याविरुद्ध दाद मागितली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या सुट्टीतील न्यायालयात न्यायाधीश जितेंद्र जैन यांच्यासमोर बहुजन विकास आघाडीने भारत निवडणूक आयोग व इतरांच्या विरुद्ध जनहित याचिका दाखल केली. यावेळी प्रतिवादी यांना याचिकेचा तपशील पुरवण्याची सुचित करण्यात आले असून त्यानंतर याबाबत सुनावणी होणार आहे.



२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने या संदर्भातील बाब महत्त्वपूर्ण असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्याने या याचिकेची सुनावणी आज सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. याचिकाकर्त्या तर्फे प्रतिवादी यांना ई-मेल द्वारे याचीकेचा तपशील पाठवण्यात आला होता. तसेच सकाळी ११.४० वाजता निवडणूक आयोगाच्या कार्यालयात याचिकेसंदर्भात नोटीस पोहोचविण्यात आली होती. तरी देखील वेळेची कमतरता असल्याने भारत निवडणूक आयोगातर्फे बाजू मांडण्यासाठी न्यायालयाच्या सुट्टीच्या खंडपीठापुढे प्रतिवादी तर्फे कोणी उपस्थित राहू शकले नव्हते.

सोमवारी (दि.४) निवडणुकीचे अर्ज मागे घेण्याची व तदनंतर रिंगणात असणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्ह देण्याचे नियोजित असून याबाबत न्यायालयाने या याचिकेची तातडीने सुनावणी घेण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध बातम्यांच्या आधारे बहुजन विकास आघाडी तर्फे शिटी या चिन्हासाठी केलेला अर्ज निकाली काढण्यात आल्याचा समज बहुजन विकास आघाडीला झाला असून त्या संदर्भात आजवर निवडणूक विभागाने कोणत्याही प्रकारचा संवाद साधला नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

उच्च न्यायालयाने निवडणूक चिन्ह देण्याबाबत केलेल्या याचिकेचे गांभीर्य पाहून प्रतिवादी यांना पुन्हा या याचिके संदर्भात माहिती ई-मेलद्वारे पाठवून नंतर न्यायालयात दाद मागावी असे आदेशात सूचित करण्यात आले आहे. त्यामुळे शिटी या निवडणूक चिन्हाची लढाई आता मुंबई उच्च न्यायालयात पोहोचली असून याबाबत सोमवारी न्यायालय कोणती भूमिका घेते, याकडे बहुजन विकास आघाडी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते लक्ष लावून बसले आहेत.

## सायकलवरील ताबा सुटल्याने मृत्यू

**। भाईंदर । वार्ताहर ।**

भरधाव वेगाने सायकलवरून येणाऱ्या एका तरूणाचा भिंतीला धडकून मृत्यू झाला आहे. मिरा रोड येथे ही घटना घडली आहे. नीरज यादव असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून तो मिरा रोडच्या गीता नगरचा रहिवासी आहे. २८ नीरज यादव मित्रांसोबत सायकलने घोडबंदर किल्ल्यावर फिरायला गेला होता. संध्याकाळी तो सायकलने परतत होता. एका गल्लीतून येत असताना त्याच्या सायकलवरील ताबा सुटला आणि तो भिंतीला जाऊन आदळला. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या संदर्भात काशीगाव पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## विरारच्या ग्लोबल सिटीमध्ये बंद सदनिकेला लागली आग

**। वसई । वाताहर।**

विरारच्या ग्लोबल सिटी परिसरातील कल्पवृक्ष या रहिवासी संकुलातील इमारतीत एका सदनिकेला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. अग्निशमन दलाकडून आगीवर नियंत्रण मिळविण्यात येत आहे



विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी परिसरात कल्पवृक्ष रहिवासी गृह संकुल आहे. या इमारतीत रात्री अचानकपणे एका बंद असलेल्या सदनिकेला आग लागली. या घटनेमुळे इमारतीमध्ये खळबळ उडाली होती. धुराचे व आगीचे मोठं मोठे लोळ पसरत असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. याची माहिती पोलिसांना व पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळताच घटनास्थळी पोहचून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम सुरू आहे. नेमकी आग कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण समजू शकले नसून घराचे मोठे नुकसान झाले आहे. ऐन दिवाळीत आगीची दुर्घटना घडल्याने नागरिक भयभीत झाले आहे. यापूर्वी आचोळे साडी कंपाऊंड परिसरात एक रहिवासी इमारतीत लग्न मंडप व डेकोरेशन साहित्य ठेवण्याच्या गोदामाला व वसई पूर्वेच्या मधूबन परिसरात कर्मा हाईड्स १५ मजली इमारतीमध्ये उदवाहकामध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली होती.

## माणकोली पुलावर दिवाळीचा आखाडा

### फटाके फोडण्यासाठी तरूणाईची गर्दी

**। डोंबिवली । वार्ताहर ।**

शहर परिसरातील बहुतांशी तरूण दिवाळी सणाचा आनंद साजरा करण्यासाठी मोठागाव येथील माणकोली पुलावर दररोज रात्रीच्या वेळेत गटाने येऊन फटाके फोडत आहेत. अनेक तरूण पुलाच्या कठड्यावर उभे राहून फटाके पेटवून उंच किंवा उल्हास नदी पात्राच्या दिशेने फेकत आहेत. रात्रीच्या वेळेत या रस्त्यावरून वाहनांची वर्दळ असते. एखादा फटाका वाहनात घुसून काही दुर्घटना होण्याची भीती काही प्रवासी व्यक्त करत आहेत.



गटागटाने हे तरूण मोठागाव ते लोढा संकुल परिसरातील पुलाच्या कठड्यावर आपल्या दुचाकी रस्त्याच्याकडेला उभ्या करून दिवाळीचा आनंद लुटत असतात. मोठ्या आवाजाचे फटाके, उंच आकाशाच्या दिशेने जाणारी विमाने, रॉकेट पुलावरून सोडली जात आहेत. त्यामुळे पुलावर फोडण्यात आलेल्या फटाकांचा कचरा, पेटत्या सुतळी पडलेल्या आहेत. माणकोली पुलावरून दोन्ही बाजुने सुसाट वाहनांची येजा सुरू असते. त्यात काही तरूण थरारक हालचाली करत पुलावरून दुचाकी चालवित असतात. एकेका दुचाकीवर तीन ते चार जण बसून प्रवास करत असल्याचे दृश्य या भागात दिसते.

## विद्यार्थ्यांकडून पर्यावरण रक्षणाचा संदेश

**। पनवेल । वार्ताहर ।**

महापालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक कुटूंबांपर्यंत पर्यावरण रक्षणासाठी पालिकेने अनेक पाऊले उचलली आहेत.

यंदाची दिवाळी पर्यावरणपूरक साजरी प्रत्येक कुटूंबांमध्ये साजरी करावी यासाठी महापालिकेने विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी माझी वसुंधरा ५.० या योजनेअंतर्गत पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच कामोठे येथील इंग्लिश मिडीयम विद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी मुलांनी काय करावे असे विविध पर्याय मुलांना सूचविण्यात आले.

तसेच पर्यावरण विषयावर विद्यार्थ्यांमध्ये रांगोळी स्पर्धा व पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनविण्याच्या स्पर्धा घेण्यात आली.



## ठाणे जिल्ह्यातही नामसाधर्म्याची खेळी

**। अंबरनाथ । वार्ताहर ।**

प्रमुख उमेदवारांच्या नावाशी साधर्म्य असलेले उमेदवार उभे करून त्यातून संभ्रम निर्माण करत मतांची फाटाफुट करण्याची खेळी गेल्या काही वर्षात सातत्याने केली जाते आहे. तसाच काहीसा प्रकार विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने बेलापूर, कल्याण पूर्व, अंबरनाथ आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघात झाल्याचे दिसून आले आहे.

बेलापूरमध्ये संदिप नाईक, मंदा म्हात्रे, मुरबाड विधानसभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार सुभाष पवार यांच्या आणि अंबरनाथ विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार राजेश वानखेडे यांच्या नावाशी साधर्म्य असलेले उमेदवार रिंगणात आहेत. कल्याण पूर्वेत महेश गायकवाड या नावाचेही दोन उमेदवार रिंगणात आहेत.

नामसाध्यर्म असलेले उमेदवार उभे करून एखाद्या उमेदवाराला पाडण्याचा प्रकार यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमध्ये झाला आहे. मतांची विभागणी झाल्याने उमेदवार पराभूत झाल्याचेही प्रकार यापूर्वी समोर आले आहेत. मात्र ही खेळी सातत्याने केली जात असल्याने यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमधून दिसून आली आहे. यंदाच्या निवडणुकीतही ठाणे जिल्ह्यात चार मतदारसंघात नावात साम्य असलेले उमेदवार दिसून आले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षात गेलेले संदिप गणेश नाईक यांच्या नावाशी साधर्म्य असलेले संदिप प्रकाश नाईक बेलापूरमध्ये अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. तर भाजपच्या अधिकृत उमेदवार मंदा विजय म्हात्रे यांच्या नावाशी साम्य असलेल्या मंदा संजय म्हात्रे या अपक्ष म्हणून रिंगणात आहेत.

सुभाष गोटीराम पवार यांच्या नावाशी साम्य असलेले सुभाष शांताराम पवार यांनीही अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात राजेश देवेंद्र वानखेडे यांच्या नावाशी साम्य असलेले राजेश अभिमन्यू वानखेडे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत.

## फराळ जगाच्या पोशिंद्याला उपक्रम

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने खास शेतकऱ्यांसाठी दिवाळी फराळ वाटप करण्याचे आयोजन तळा तालुक्यात करण्यात आले आहे.५ नोव्हेंबर रोजी कुणबी भवन येथे सकाळी ११.३० वा.या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.तालुक्यात प्रथमच या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार स्वाती पाटील,सहाय्यक पोलिस निरीक्षक सतीश गवई उपस्थित राहणार आहेत त्याच बरोबर तळा पंचायत समिती गटविकास अधिकारी,तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे,तळा वनपाल विलास तांबे, महावितरण उपकार्यकारी अधिकारी घावरे बँक ऑफ इंडिया शाखा प्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा प्रबंधक, तळा तालुका पत्रकार संघटना,व्यापारी असोसिएशन तळा,तळा मिनिडोर चालक मालक संघटना,ॲपे रिक्षा चालक मालक संघटना,पोस्ट ऑफिस तळा ,एसटी व्यवस्थापक तळा या सर्व शासकीय अधिकारी वर्ग आणि शेतकरी वर्गाला निमंत्रित करण्यात आले आहे.

## स्कुटीला धडक; सहा जणांच्या अंगावर घातली गाडी

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

मित्राच्या स्कुटीला धडक दिल्याचा राग अनावर झाल्याने पाच सहा जणांच्या अंगावर स्कार्पिओ गाडी घालून त्यांना ठार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार सानपाडा येथे घडला आहे. या प्रकरणी स्कार्पिओ चालकाच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी आणि फिर्यादी यांनी एकमेकांच्या विरोधात तक्रार दिली आहे.

दिग्विजय शेळके असे यातील आरोपीचे नाव असून तोच स्कार्पिओ चालवत होता. सानपाडा सेक्टर एक येथे अखिलेश कुंदर, आयुष पाटील, युगांत वास्कर, मीत पाटील,समर पाटील, निहाल इंदुलकर आणि सिद्धेश कांबळे हे एकमेकांच्या परिचित असलेले सहज भेटण्यास किचन डिलाइट हॉटेलजवळ रस्त्यावर एकत्र जमले होते. यातील आयुष हे थोडे उशिरा स्वतःची कार घेऊन आले असता त्यांच्या गाडीला एका अनोळखी स्कुटी चालकाने धडक मारली. त्यावरून बाचाबाची सुरु झाली. स्कुटी चालकाने त्याचा मित्र यातील आरोपी दिग्विजय शेळके याला बोलावले. शेळके हा स्कार्पिओ घेऊन आला आणि उपस्थित असलेले लोक मित्राशी वाद घालतात हे लक्षात आले त्यावेळी त्याने मागेपुढे न पाहता सर्वांच्या अंगावर गाडी घातली. गाडी वेगात येत असल्याचे लक्षात आल्यावर सर्व जणांनी जीव वाचवण्यासाठी इकडे तिकडे पळाले. तरीही गाडी परत घेत त्याने पुन्हा तेच कृत्य केले. आणि जाता जाता शिवीगाळ करून धमकी देत निघून गेला. या घटनेत फिर्यादी कुशल कुंदर याच्या उजव्या अंगठ्याजवळ जखम झाली. युगांत वास्कर याच्या हाताला स्कार्पिओ गाडीचा आरसा लागून मार बसला तर अन्य दोघांना किरकोळ मार लागला. हि घटना ३१ तारखेला रात्री साडे अकराच्या दरम्यान घडली मात्र फिर्यादी हे सुरवातीला घाबरले होते मात्र शुक्रवारी त्यांनी सानपाडा पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरोधात तक्रार दिली. तक्रारीची दखल घेत आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## ३०० बागायतदार विमा परताव्यापासून वंचित

- **जिल्हाधिकाऱ्यांकडे केली तक्रार**
- **हवामानमापक बदलल्याचा फटका**

**। राजापूर । वार्ताहर ।**

प्रतिकूल हवामान आणि अवकाळी पावसामुळे तालुक्यातील भू-खिणगिणी-कोतापूर-पेंडखळे परिसरातील आंबा-काजू बागायदारांचे यंदा मोठ्याप्रमाणात नुकसान झाले होते. त्या बागांचा विमा उतरविण्यात आलेला असतानाही लाभांश मिळालेला नाही. या परिसरातील सुमारे तिनशेहून अधिक बागायतारांना फटका बसलेला आहे. याची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदविण्यात आली असल्याचे येथील बागायतदारांनी सांगितले.

तालुक्यातील भू पसिरामध्ये आंबा-काजूच्या बागायती आहेत. दरवर्षी या बागायतदारांना हंगाम ातील प्रतिकूल हवानामाना फटका बसतो. २०२३-२४ या वर्षातही येथील बागायतदारांनी अवकाळी पावसासह प्रतिकूल हवामानाचा चांगलाच फटका बसलेला आहे. त्यामुळे बागायतीचे मोठे नुकसान झालेले आहे. गेल्या काही वर्षामध्ये सतत ही परिस्थिती निर्माण होत असल्याने खर्च आणि उत्पन्नाचा मेळ बसविताना बागायतदारांची दमछाक झाली आहे.

या स्थितीत शेतकऱ्यांना शासनाच्या पिकविम्याच्या संरक्षणाची हमी मिळेल अशी आशा होती. मात्र यावर्षी त्यांना नुकसानभरपाईच मिळालेली नाही. त्यामुळे बागायतदार चिंताग्रस्त झाले आहेत. भू हे महसुली मंडळ पूर्वीपासून गोवळ किंवा राजापूर या मंडळाशी जोडलेले होते. तसेच भू मंडळाजवळील हवामानमापक केंद्र ओणी व गोवळ हे केंद्र सोडून कृषी विभागाने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता लांजा तालुक्यातील हर्चे या हवामानमापक केंद्राला जोडले. त्यामुळे ओणी व गोवळ परिसरातील बागायतदारांना विम्यासाठी आवश्यक ट्रीगर ॲक्टिव्ह झाले होते. परंतू भू आणि परिसर हर्चेला जोडलेला असल्यामुळे तेथील ट्रिगर ॲक्टिव्ह झालेले नाहीत. त्यामुळे येथील बागायतदार पीकविमा नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेले आहेत. शासन निकषानुसार बागायतदारांनी पीकविम्याचा हफ्ता भरलेला होता. तरीही लाभ रिळालेला नाही. त्यामुळे महसूली निकषानुसार नुकसानभरपाई रिळावी, अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## डीजे, ढोलताशांच्या दणदणाटाने रहिवासी हैराण

**। डोंबिवली । वार्ताहर ।**

**उत्सवी रस्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवली पूर्वेतील फडके रस्त्यावर सण, उत्सवांच्या काळात मोठ्या आवाजात डीजेवर गाणी, ढोलताशांचे वादन केले जाते. सण, उत्सव काळात होणाऱ्या या दणदणाटाने फडके रस्ता भागात राहणारे रहिवासी, रुग्णालय चालक, व्यापारी त्रस्त झाले आहेत.**



गुरुवारी फडके रस्त्यावर ढोलताशा वादनास चेंगराचेंगरीचे कारण देत पोलिसांनी बंदी घातली होती. दिवाळी सणाच्या दिवशी फडके रस्त्यावर ढोलताशांचे वादन ही पूर्वपरंपार प्रथा आहे. त्यामुळे राजकीय मंडळींनी हस्तक्षेप केल्यानंतर पोलिसांनी ढोलताशा वादनास पथकांना आवाजाची मर्यादा पाळून वादन करण्यास टिळक रस्त्यावर परवानगी दिली होती. यापूर्वी ढोलताशा वादनास परवानगी नाकारल्याने मोजकीच पथके गुरुवारी वादनास हजर होती.

फडके छेद रस्त्यावरील टिळक रस्त्यावरील ब्राह्मण सभा भागात या पथकांनी गुरुवारी दिवाळीच्या पहिल्या दिवशी वादन केले. हे वादन पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी उसळते. ढोलताशांचे वादन गुरुवारी दोन ते तीन तास चालू होते, असे सोसायट्यांमधील अनेक रहिवाशांनी सांगितले. या दोन ते तीन तासाच्या कालावधीत या भागाती शांतता भंग पावली होती. घरात रुग्ण, लहान बाळे असतात. त्यांना मर्यादे पलीकडचा आवाज सहन होत नसतो. असे असताना या दणदणाटामुळे आम्ही रहिवासी खूप अस्वस्थ होतो, असे रहिवाशांनी सांगितले.

सण, उत्सव असला की उत्सवी कार्यक्रम फडके रस्त्यावर होतात. याठिकाणी यापूर्वी शांततेत कार्यक्रम पार पडत होते. शेकडो नागरिक या उत्सवी कार्यक्रमात सहभागी होत होते. त्यावेळी कोणालाही कसलाही त्रास होत नव्हता. गेल्या काही वर्षापासून उत्सवी कार्यक्रमांच्यावेळी डीजेवरची गाणी, ढोलताशा पथकांचा गजर फडके रस्त्यावर सुरू झाल्यापासून या भागातील शांततेचा भंग होण्यास सुरुवात झाली आहे, असे रहिवाशांनी सांगितले.

ढोलताशा वादन ही एक कला आहे. या पथकांनी फडके रस्त्याच्या विविध भागात आवाजाची मर्यादा पाळून ढोलताशा वादन केले तर आमची हरकत नाही. एकाच ठिकाणी, एकाच रस्त्यावर ही पथके एकत्र येतात. एकाचवेळी वादन सुरू होत असल्याने परिसरातील शांततेचा भंग होतो. आवाजाची मर्यादा पाळून हे कार्यक्रम झाले पाहिजेत, अशी भावना रहिवाशांनी व्यक्त केली.



● अलिबाग तालुक्यातील महाजने येथील लहान मुलांनी बनविलेला किल्ला. (छायाचित्रः प्रमोद जाधव)



● दिवाळी सणाचे औचित्य साधून मुरूड शहरातील व पंचक्रोशी परिसरातील लहान मुले मातीचे किल्ले तयार करत आहेत. या किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज, तोफा, मावळे, तोफ, किल्ल्याचे प्रवेशद्वार, शेतकरी, महिला-पुरूष, द्वारपाल यांच्या प्रतिकृतींची खरेदी करण्यात आल्या आहेत. (छायाचित्रः गणेश चोडणेकर)



● अलिबाग तालुक्यातील चेंढरे येथील मिहिर दिपक पाटील याने मातीपासून बनविलेली प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती.



● पनवेल तालुक्यातील खांदा वसाहत सेक्टर ८ मधील सी टाईप सरोदय सोसायटीमधील लहान मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती उभारली आहे. (छाया राजेश डांगले)




● सालाबादप्रमाणे शिवप्रताप ग्रुप बोर्ली पंचतन यांनी विनायक पयेर यांच्या निवासस्थानी किल्ले सिहंगडाची प्रतिकृती सादर केली आहे. यावेळी कलाकार विनायक पयेर, साहिल गाणेकर, सुजल पयेर, सनी पयेर, वेदांत पाटील, स्मित पयेर यांनी या हा गड साकारला आहे. (छायाचित्रः अमेय नाझरे)



● कुणाल नाईक आणि हार्दिक नाईक यांनी मातीपासून साकारलेली प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती.



● अलिबाग तालुक्यातील चौल भगवती येथील मातीपासून बनविलेली दिल से गडाची प्रतिकृती.



● दिवाळी सणानिमित्त मातीपासून किल्ल्यांची प्रतिकृती निर्माण करून चिमुकल्यांनी महाराष्ट्रातील किल्ले संवर्धनाचा संदेश दिला आहे. किल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, सैन्य, तोफ, वाघ, हती, हरीण असे विविध प्राणी ठेवण्यात आले आहेत. तसेच, तोफेची जागा, भुयारी मार्ग, नगार खाना, दारु गोळा, गुप्त बैठक, पाण्यांचे हौद, तलाव, विहीर, गुरांचा गोठा, मंदिर, मावळ्यांचा राहण्याचा निवारा जणू दाखविण्यात आला आहे.



● सनी शिवलकर, समृद्धी नाईक, वीराज लाड आणि सार्थ शिवलकर यांनी साकारलेली तोरणा किल्ल्याची प्रतिकृती.



● श्री स्वामी समर्थ बालसंस्कार वर्गाची विद्यार्थिनी आरोही कदम हिने साकारलेली किल्ल्याची प्रतिकृती.



● बहीण सासरी गेली असल्यामुळे सातत्याने जाता येत नसले तरी भाऊबीजेच्या निमित्ताने भाऊ हातातली कामे बाजूला ठेऊन आपल्या लाडक्या बहीणीकडे जात असतो. यादिवशी बहीण भावाच्या अखंड प्रेमाचा झरा वाहताना दिसतो.




● शिहू येथिल श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात लक्ष्मीपूजनचे औचित्य साधून दीपोत्सव मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी २ हजार दिव्यांनी आणी आकर्षक रांगोळ्यांनी मंदीर परिसर सजविण्यात आला होता. यात तरुणांसह महिलांनीही बहुसंख्येने सहभाग घेतला होता.



● अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील वेदांत तुषार पाटील याने मातीपासून साकारलेली किल्ल्याची प्रतिकृती.



● दिवाळीत भातकापणीला सुरवात झाली असून भाताचे भारे बांधण्यासाठी लागणारे दोरे वळताना महिला वर्ग. (छायाचित्रः प्रमोद जाधव)



● ९१ वर्षाचा भाऊ आणि ८५ वर्षाची बहीण यांची आगळीवेगळी भाऊबीज. आजपर्यंत भाई वनारसे यांची एकही भाऊबीज चुकलेली नाही. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A.प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाउस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३

● शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नोंदणी. ५० शाखा-वेबसाईट नोंदणीसाठी-९२२६७६६१२९,९३७०५१७९४९

● weight loss by 6 Natural Therapies (No madicine-No Exercise-No suppliment) wellness clinic-9226766129

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरणमध्ये भव्य रांगोळी प्रदर्शन

। उरण । प्रतिनिधी ।

दिवाळीनिमित्त रंगावली कलादर्शन उरण आणि लायन्स क्लब ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण शहरातील एन.आय. हायस्कूल येथे भव्य रांगोळीचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी (दि.२) एन.आय. हायस्कूलचे चेअरमन सदानंद गायकवाड, लायन चंद्रकांत ठक्कर, संजीव अगरवाल यांच्या हस्ते करण्यात आले. हे रांगोळी प्रदर्शन दिनांक ९ नोव्हेंबरपर्यंत सकाळी १० ते दुपारी १ तर सायंकाळी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत विनामूल्य पाहता येणार आहे.

या प्रदर्शनात थ्रीडी रांगोळी, व्यक्तीचित्र, निसर्गचित्र अशा विविध प्रकाराच्या रांगोळ्या काढण्यात आल्या आहेत. नंदकुमार साळवी, दर्शन पाटील, सिद्धार्थ नागवेकर, नवनित पाटील, सत्या कडू, संतोष पाटील, राजेश नागवेकर, स्वप्नाली मणचेकर, ध्रुव म्हात्रे, वैष्णवी जाधव आदिकलाकांरानीउत्कृष्ठअसेरांगोळी काढून प्रेषकंची मने जिंकली आहेत. यावेळी रांगोळी कला बघण्यासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. तसेच, कलाकारांची कला जनतेसमोर यावी, कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावी आणि दिवाळीमध्ये नागरिकांना रांगोळी कलेचा आनंद लुटता यावा या दृष्टीकोनातून उरणमध्ये रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आले आहे. तसेच, जास्तीत जास्त नागरिकांनी हे रांगोळी प्रदर्शन आवर्जुन पहावे, असे आवाहन नंदकुमार साळवी, राजेश नागवेकर यांच्यासह अन्य कलाकारांनी केले आहे.






● लहानगी बहीण आपल्या लहान भावाला ओवाळणी करून भाऊ बहिणीच्या नात्याचा विश्वास दृढ करीत आहेत.
(छायाचित्र :उदय कळस)

# मुरुड-अलिबाग रस्त्यावर चक्काजाम

## दोन तासांऐवजी तीन तासांचा प्रवास



**। मुरुड । प्रतिनिधी ।**

**दिवाळी सुट्टी आणि रविवार त्याच दिवशी भाऊबीज या तृतीय योगामुळे मुरुड-अलिबाग रस्त्यावर चक्का जाम झालेला पहावयास मिळाला. या प्रवासादरम्यान मुरुड ते अलिबाग एसटी बसला जास्तीत जास्त दोन ते पावणे दोन तास लागतात. तरी या दिवाळी भाऊबीज सणामुळे या रस्त्यावर पावणे दोन तासांऐवजी तीन तासांचा प्रवास करावा लागला. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.**

पावसाळी हंगामानंतर दिवाळी सणाला मोठ्या प्रमाणात शाळांना सुट्टी पडली असते. त्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणात कोकण फिरायला येत असतात. मुरुड तालुक्यातील जगप्रसिद्ध काशीद बीचवर मोठ्या संख्येने पर्यटक हजेरी लावत असतात, तसेच मुरुड जंजिरा किल्ला पाहावयास मोठ्या प्रमाणात पर्यटक येण्यास सुरुवात होत असते, त्यामुळे मोठ्या प्रमाणात शनिवारी आणि रविवारी वाहतूक कोंडी होत असते. यावेळी रविवारी सुट्टीच्या दिवशी भाऊबीज आल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली.

भाऊबीजेच्या निमित्ताने बाहेरगावी दिलेल्या आपल्या बहिणींकडे जाण्यासाठी भावांचा मोठ्या प्रमाणात प्रवास होत असतो. या दिवशी इतकी प्रचंड गर्दी असते की रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. एसटी बसने प्रवास करताना मोठ्या प्रमाणात गर्दी पास मिळतो. यावेळी या प्रवासादरम्यान एका प्रवाशाने मुरुड अलिबाग रस्त्यावर बसमधून काढलेले छायाचित्र रस्त्यावर झालेली प्रचंड वाहतूक कोंडी दर्शवत आहे.

## सुचिता शेळके यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील पुगाव गावातील रहिवासी सुचिता प्रभाकर शेळके (देशमुख) यांचे रविवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांसहित समस्त पुगाव ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, मुलगा, दीर, पुतणे, नातवंडे व शेळके परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार, दि.५ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र कमलेश्वर मंदिर पुगाव येथे, तर उत्तरकार्य विधी शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी त्यांच्या पुगाव येथील निवासस्थानी होणार आहे. यानिमित्ताने सकाळी १०.३० ते ११.३० वाजता सुषमाताई सुभाष देशमुख यांचे प्रवचन होणार आहे.

# पत्रकारांचे समाजातील काम आदर्शवत



## प्रीतम म्हात्रे यांचे गौरवोद्गार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सतत २४ तास निःस्वार्थीपणे काम करणारा पत्रकार हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. पनवेल, उरण आणि नवी मुंबईमधील पत्रकार चांगले काम करीत आहेत. पत्रकारांनी चांगले काम करून समाजात चांगला आदर्श निर्माण केला आहे, त्यामुळे पत्रकारांप्रती आदर प्रेम बाळगत एक कुटुंब म्हणून म्हात्रे कुटुंबातर्फे दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा खजिनदार प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी दिली.

शनिवारी सकाळी ११ वाजता रंजना बंगला, जे.एम. म्हात्रे यांचे निवासस्थान, कोपर गाव, सेक्टर ८, उलवे येथे पत्रकारांसाठी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याचवेळी पत्रकार आप्पासाहेब मगर यांच्या जनसभा या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी प्रसिद्ध उद्योजक जे.एम. म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत यांनीही पत्रकारांच्या कार्याचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पत्रकारांचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ पत्रकार माधवराव पाटील, पत्रकार मंदार दोंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करत एका चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगत जे.एम. म्हात्रे, प्रीतम म्हात्रे यांचे आभार मानले. दिवाळी फराळ कार्यक्रमामुळे पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

# शिहू विभागात पोलिसांचे पथसंचलन

**। शिहू । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवार, दि. २ नोव्हेंबर रोजी नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील कुहीरे, बेणसेवाडी, शिहू, बेणसे, तरशेत या गावांमध्ये नागोठणे पोलिसांनी पथसंचलन केले. विधानसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या संबंधित डीवायएसपी दौंडकर, नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली हे पथसंचलन करण्यात आले. यावेळी सीमासुरक्षा दलाचे एक अधिकारी व ५० जवान, नागोठणे पोलीस ठाण्याचे ३ पोलीस अधिकारी, एक महिला अधिकारी व १० पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.



# विद्यार्थ्यांचा मतदान जनजागृतीसाठी पुढाकार





**। माणगाव । प्रतिनिधी ।**

स्वीप कार्यक्रमांतर्गत माणगाव येथील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती केली. राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या असून, त्याकरिता दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्या अंतर्गत शंभर टक्के मतदान व्हावे यासाठी निवडणूक आयोग पुरस्कृत स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असून, या कार्यक्रमांतर्गत माणगाव येथील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती केली. या स्वीप कार्यक्रमांतर्गत आदर्श प्राथमिक विद्यामंदिरमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रथमतः माणगावातून रॅली काढून मतदान जनजागृतीपर घोषणा देण्यात आल्या. या शाळेमध्ये शाळास्तरावर मतदान जनजागृतीपर चित्रकला स्पर्धा, रंगभरण स्पर्धा व रांगोळी स्पर्धा तसेच प्रबोधनपर निबंध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे स्वीप कार्यक्रमात आदर्श प्राथमिक विद्यामंदिर शाळेने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



# साबळे विद्यालयात मतदान जनजागृती अभियान

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या अशोकदादा साबळे विद्यलयातर्फे मतदान जनजागृती अभियान कार्यक्रम दि.२१ ते दि.२६ ऑक्टोबरदरम्यान उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत साबळे विद्यालयातर्फे रांगोळी स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,पथनाट्य, विद्यार्थी रॅली तसेच बाईक रॅली काढण्यात आली. क्रीडा शिक्षक वाढवळ व डॉ. रावळे यांच्या उपस्थितीत बाईक रॅली काढण्यात आली. यावेळी समस्त माणगावकरांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. या मतदान जनजागृतीच्या विविध कार्यक्रमात मुख्याध्यापक डी.एम. जाधव, उपमुख्याध्यापक दिलीप उभारे, उपप्राचार्य जमधाडे, पर्यरक्षक सोनावणे, शिक्षक प्रतिनिधी पाटील तसेच शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.



■ मध्य रेल्वेच्या हार्बर लाईन्सला भाऊबीजेनिमित्त बहिणींकडे जाण्यासाठी भावांची मोठ्या संख्येने गर्दी झाल्याचे पाहावयास मिळाले.

(छायाचित्र : राजेश डांगळे)

# 'दिवाळी पहाट'ने मुरुडकर मंत्रमुग्ध

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

दिवाळी सणाचे औचित्य साधून मुरुड सार्वजनिक वाचनालयात दिवाळी पहाट संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सदस्य नैनिता कर्णिक यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलित करून करण्यात आले. यावेळी प्रवीण बैकर, संजय गुंजाळ, ग्रंथपाल उत्कर्ष गुंजाळ, सानिका भायदे आदी कर्मचारी, वाचक उपस्थित होते.

दिवाळी पहाटची सुरुवात गायक सुरेश सद्रे यांच्या गीताने सुरुवात करण्यात आली.तद्नंतर राहुल वर्तक, पूजा सद्रे, मनीष माळी, अमोल रणदिवे, राज पुलेकर, सिद्धेश करंबे, राघव करंबे यांनी अतिशय सुंदर गीते सादर करून प्रेक्षकांची मन जिंकली. कार्यक्रमाला खरी रंगत सुंदर निवेदन करून प्रेरणा चौलकर यांनी आणली, तर हार्मोनियम साथ मंदार मुंबईकर, तबला व ढोलकी महेश सुर्वे यांनी साथ दिली.


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल श्री. मनोज रविंद्र ठोबरे रा. कोशाणे, ता.कर्जत, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-कोशाणे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न | हि.न | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.प्रविण कानजी तन्ना | ५१ | ४ | ०-०६-१०<br>पो.ख ००-०६-६०<br>एकूण क्षेत्र ००-१२-७०<br>हे. आर.प्रति | ०-३१ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबेकब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ३/११/२०२४

सही /-

**ॲड सतीश अर्जुन शेळके**

(बी.ए.एल.एल.बी)मुंबई हायकोर्ट

ऑफीस पत्ता-नारायण देशमुख

हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व

कर्जत-रायगड मो.नं.९८८११३२२४८

# अनिल नवगणेंच्या प्रचाराचा नारळ फुटला

**। म्हसळा । वार्ताहर ।**



## धावीर महाराजांचे दर्शन घेऊन प्रचार सुरू

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, मतदान वीस दिवसांवर येऊन ठेपले आहे. यादरम्यान म्हसळा शहराचे ग्रामदैवत धावीर महाराजांचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल नवगणे यांनी दर्शन घेऊन प्रचाराला सुरवात केली. याप्रसंगी श्रीवर्धन मतदारसंघातील जनतेचा विश्वास आणि शरद पवार राष्ट्रवादीने दिलेल्या संधीचे सोने करणार असल्याची भावना नवगणे यांनी व्यक्त केली.

शिवसेनेचा जिल्हाप्रमुख असताना श्रीवर्धन मतदारसंघातील जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला असून, त्याची पावती जनता मतदानरुपी आशीर्वादातून देणार आहे. मात्र, भगवंतांची कृपा, साधुसंतांचे आशीर्वाद घेणे आपली संस्कृती आहे.

आगामी काळात राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस आय, कुटुंबीय, मित्रपरिवार आदी मिळून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढू, असे ते म्हणाले. यावेळी शहरप्रमुख विशाल सायकर, ज्येष्ठ शिवसैनिक अनंत नाक्ती, उपतालुका प्रमुख हेमंत नाक्ती, अभय कळमकर, अंकुश नटे, राहुल जैन, नदीम दफेदार, शिवा आणि महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

Format C-1

(for candidate to publish in Newspapers, TV)

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Int3erest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate: Mahendra Sadashiv Thorve, At. Posari, Post. Tiware, Tal. Karjat, Dist.Raigad.

Name of political party : Shiv Sena

(Independent candidates should write "Independent" here)

Name of Election: Maharashtra Legislative Assembly Election - 2024

*Name of Constituency: 189 - Karjat

I, Mahendra Sadashiv Thorve (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending criminal cases**

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case (s) | Sections (s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Ulhasnagar Chopra Court | 318/2012 | Pending | IPC 420, 423, 464, 465, 466, 467, 468, 469, 471, 34 |
| 2 | High Court, Mumbai | 84/2009 | Pending | IPC 341, 307, 323, 147, 148, 149R/W34 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sr. No. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1 | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. सुलोचना मधुकर पाटील रा. पुर्वा बंगला, गोकुळ नगर, बायपास रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. यांच्याकडून सदर मिळकत कायम विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. त्या संदर्भात उभयतांमध्ये दिनांक ३१/१०/२०२४ रोजी बयाणा पावती झालेली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे-अलिबाग, ता. अलिबाग सिटी सर्व्हे नंबर ७३५/अे, क्षेत्र - ४९५.०० चौ.मी., सिटी सर्व्हे नंबर ७३५/बी, क्षेत्र ८३.६१ चौ.मी. व त्या मधिल अलिबाग नगरपालिका घर मिळकत क्र.१५५१/२,१५५१/३ व १५५२ (गट नंबर-१४५/१, क्षेत्र-४.९५.०० चौ.मी., आकारणी -१३८.६० रू.पै.)**

वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे. असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व मुदतीनंतर आलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग.

दि. ०३/११/२०२४

सही/-

**ॲड. राजीव नथुराम शेरमकर**

रा.समर्थ को.ऑप.हौसिंग सोसायटी, रोहिदास नगर, चेंढरे, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे, वांदोली आदीवासीवाडी ता. रोहा, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्री. रामचंद्र नागु म्हात्रे रा. बोरघर, पो.बापळे, ता.अलिबाग जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील जमीन मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे. सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या वहिवाटिचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिध्द झाल्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वांदोली आदीवासीवाडी, ता. रोहा जि.रायगड | ६ | ३-७५-७०<br>पो.ख. १-२५-३०<br>एकूण ५-०१-०० | २.५२ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री. रामचंद्र नागू म्हात्रे यांचे मालकीचे क्षेत्र २-५०-०० हे. आर जमिन मिळकतीपैकी क्षेत्र २-००-०० हे.आर जमिन मिळकत नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग

दिनांक : ०३/११/२०२४

**(ॲड.वैभव वसंत पाटील)**

रा.नवेदर बेली, ता. अलिबाग

जि. रायगड, मो.९८५०२६१००८

खरेदीदाराचे वकील

# भारतीय संघाचे वस्त्रहरण!

## किवींकडून व्हाईटवॉशची नामुष्की | जागतिक कसोटीतील अव्वल स्थान संपुष्टात



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय क्रिकेट संघासाठी रविवारी हा अत्यंत खराब दिवस ठरला आहे. कारण भारतीय संघाला न्यूझीलंडविरुद्ध तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत व्हाईटवॉशच्या नामुष्कीला सामोरे जावे लागले आहे. तसेच, भारतीय संघ मायदेशात पहिल्यांदाच कसोटी मालिकेत ३-० अशा फरकाने पराभूत झाला आहे. यामुळे भारतीय संघाचे दुहेरी नुकसान झाले आहे. तसेच, एजाज पटेलने न्यूझीलंडच्या दोन्ही डावात पाचपेक्षा जास्त बळी आणि सामन्यात एकूण ११ बळी घेत संघाच्या विजयात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. या मैदानावर त्याने यापूर्वी एका डावात १० बळी घेण्याचा पराक्रम देखील केला आहे. यावेळी भारताला व्हाईटवॉश तर स्वीकारावा लागलाच, पण याचबरोबर जागतीक कसोटी अजिंक्यपद २०२३-२५ स्पर्धेच्या गुणतालिकेतील अव्वल स्थानही गमवावे लागले आहे.

मुंबई कसोटीतील या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी निवडली होती. यावेळी भारतीय गोलंदाजांनी चांगली कामगिरी करून न्यूझीलंडचे १० बळी घेऊन त्यांना २३५ धावांवर रोखले होते. यात जडेजाने ५ बळी घेतले होते. मात्र, फलंदाजीच्या पहिल्या डावामध्ये पुन्हा एकदा भारतीय संघ ढेपाळला. आणि भारताचा डाव २६३ धावसंख्येवर मर्यादित राहून केवळ २८ धावांची आघाडी घेतली. न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावामध्ये देखील भारतीय संघाच्या गोलंदाजांनी अवघ्या १७४ धावसंख्येवर रोखले होते. यामुळे भारताला विजयासाठी १४७ धावांचे सोपे आव्हान होते. मात्र, दुसऱ्या डावामध्ये सुद्धा भारतीय संघाचे दिग्गज फलंदाज फ्लॉप ठरले. रोहित शर्मा ११ तर विराट कोहली हा १ धाव करून बाद झाला. ऋषभ पंत (६४) वगळता इतर कोणताही फलंदाज चांगली कामगिरी करू शकला नाही आणि भारताला अवघ्या २५ धावांनी लाजीरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला.

### भारताला मोठ्ठं आव्हान

भारतीय संघाला जागतीक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील अखेरची मालिका ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायची आहे. २२ नोव्हेंबरपासून ही पाच सामन्यांची मालिका सुरु होणार आहे. आता जर भारताला अंतिम सामना खेळायचा असेल, तर त्यांना ऑस्ट्रेलिया दौऱ्यात ४ सामने जिंकावेच लागणार आहेत. जर असे झाले नाही, तर भारताला स्पर्धेचा अंतिम सामना खेळण्याला मुकावे लागू शकते.

### एजाजने रचला इतिहास

न्यूझीलंडच्या या विजयात महत्वाचे योगदान देणाऱ्या फिरकीपटू एजाज पटेलने वानखेडे स्टेडियमवर विक्रम रचला आहे. तो भारतातील एका स्टेडियममध्ये सर्वाधिक बळी घेणारा विदेशी गोलंदाज ठरला आहे. एजाज पटेलने मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आतापर्यंत २४ बळी घेतले आहेत. याच मैदानावर गेल्या भारतीय दौऱ्यात त्याने एका डावात १० बळी घेत इतिहास रचला होता. अशी कामगिरी करणारा तो न्यूझीलंडचा पहिला आणि जगातील तिसरा गोलंदाज ठरला.

### प्रथम स्थानावरून घसरण

ही मालिका सध्या सुरु असलेल्या जागतीक कसोटी अजिंक्यपद २०२३-२५ स्पर्धेचाही भाग असल्याने मालिकेच्या निकालाचा परिणाम गुणतालिकेवरही झाला आहे. भारतीय संघाची ५८.३३ विजयी टक्केवारीसह दुसऱ्या क्रमांकावर घसरण झाली आहे. यामुळे ऑस्ट्रेलिया संघ आता ६२.५० विजयी टक्केवारीसह पहिल्या क्रमांकावर विराजमान झाला आहे. दरम्यान, न्यूझीलंडने मुंबई कसोटी जिंकल्याने आता ते गुणतालिकेत दक्षिण आफ्रिकेला मागे टाकत चौथ्या क्रमांकावर आले आहेत. न्यूझीलंडची विजयी टक्केवारी ५४.५५ अशी आहे.

# आर्यन निकाळजेचे दमदार शतक



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोशीएशनच्यावतीने एकोणीस वर्षाखालील मुलांच्या मर्यादित ४० षटकांच्या एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या स्पर्धेत कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी संघाचा सलामीवीर फलंदाज आर्यन निकाळजे यांनी जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाविरुध्द १२० चेंडुंचा सामना करत १९ चौकार व २ षटकाच्या साह्याने नाबाद १५२ धावा काढल्या आहेत. तसेच, त्याच्या शतकी खेळीने संघाला विजय मिळवून दिला आहे.

नवी मुंबईतील खारघर इनामपुरी येथील बी.पी पाटील क्रिकेट मैदानावर खेळला गेलेल्या सामन्यात अलिबाग संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले होते. प्रथम फलंदाजी करताना कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी संघाने दमदार सुरूवात करत सलामीवीर फलंदाज आर्यन निकाळजेने नाबाद १५२ धावा काढल्या. तर, मधल्या फळीत फलंदाजीला आलेल्या अथर्व खांडेकरने अवघ्या ६७ चेंडून मध्ये नाबाद ८३ धावा काढल्या आहेत. ४० षटकांच्या समाप्ती नंतर कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी संघाने २ गडी बाद ३३७ धावा फलकावर लावल्या होत्या. प्रतिउत्तर देताना जगदीश क्रिकेट अकॅडमी संघाचा डाव ९१ धाव संख्येवर संपुष्टात आला.

# तीन वर्षीय अनीशचा विक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतातील अनेक युवा बुद्धीबळ खेळात आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. अशातच आता अवघ्या ३ वर्षाच्या अनीश सरकारने मोठा विक्रम केला आहे. त्याने 'फिडे चेस रेटिंग'मध्ये स्थान मिळवले आहे. अनीश कोलकातामध्ये राहत असून आता तो फिडे चेस रेटिंग मिळवणारा जगातील सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. त्याला जेव्हा फिडे रेटिंग मिळाले, तेव्हा त्याचे वय ३ वर्षे, ८ महिने आणि १९ दिवस होते. त्याने आत्तापर्यंत विविध स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केली आहे.



**'फिडे चेस रेटिंग'मध्ये स्थान**

अनीश सध्या ग्रँडमास्टर दिब्येंदु बरुआ यांच्या अकादमीमध्ये मार्गदर्शन घेत आहे. त्याने आत्तापर्यंत बरुआ यांनाही प्रभाविक केले आहे. बरुआ यांनी पीटीआयला सांगितले की, अनीश त्यांना मित्रभा गुहाची आठवण करून देतो. मित्रभा २० व्या वर्षी ग्रँड मास्टर बनले होते. तसेच, अनीशला एका विशेष गटात ठेवलं असून तो सात-आठ तास प्रशिक्षण घेतो. तो एकदा बुद्धिबळ खेळायला लागला की लवकर उठत नाही. असेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्राची अंतिम फेरीत धडक

**। पुणे । प्रतिनिधी ।**

नवसह्याद्री क्रीडा संकूल यांच्या तर्फे व शेपिंग चॅम्पियन्स फाउंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित होत असलेल्या अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज (१४ वर्षाखालील) टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या नमिश हूड, आर्यन किर्तने यांनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

नवसह्याद्री क्रीडा संकूल टेनिस कोर्ट येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्य फेरीत मुलांच्या गटात बाद फेरीत पुण्याच्या नमिश हूडने आपला शहर सहकारी सहाव्या मानांकित स्मित उंद्रेचा ६-३, ६-३ असा पराभव करून आपली अनपेक्षित निकालाची मालिका कायम राखली.



**■ महाराष्ट्रच्या नमिश हूड आणि आर्यन किर्तने यांच्याकडून मानांकित खेळाडूंचा पराभव**

पुण्याच्या बिगर मानांकित आर्यन किर्तनेने अव्वल मानांकित प्रज्ञेश शेळकेचा टायब्रेकमध्ये ७-५, ७-६(१) असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

मुलींच्या गटात अव्वल मानांकित राजस्थानच्या आराध्या मीनाने पाचव्या मानांकित महाराष्ट्राच्या सृष्टी सूर्यवंशीचा ६-४, ६-३ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. दुसऱ्या मानांकित पुण्याच्या श्रावी देवरेने चौथ्या मानांकित प्रार्थना खेडकरचा ६-१, ५-७, ६-१ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरी गाठली आहे.

## हाँग काँग सिक्सेस स्पर्धा २०२४

# भारताचे आव्हान संपुष्टात

**। हाँग काँग । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचे हाँग काँग सिक्सेस स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. शनिवारी (दि.२) भारतीय संघाला सलग दोन पराभवांचा सामना करावा लागला आहे. संयुक्त अरब अमिरातीने १ धावेने थरारक विजय मिळवला, तर इंग्लंडनेही १५ धावांनी सामना जिंकला आहे.

६-६ षटकांच्या हाँग काँग सिक्सेस या स्पर्धेत अनेक माजी स्टार खेळाडू खेळत आहेत. यावेळी भारत-पाकिस्तान यांच्यातल्या सामन्याने सर्वांचे लक्ष वेधले होते. परंतु, यातही भारताची हार झाली होती. शनिवारी झालेल्या पहिल्या लढतीत भारत-यूएई समोरासमोर आले होते. संयुक्त अरब अमिरातीने ६ षटकांत ५ बाद १३० धावा केल्या होत्या. मनोज तिवारीच्या एका षटकात ३५ धावा कुटल्या गेल्या आणि त्या संघाला महागात पडल्या. खालिद शआने १० चेंडूत १ चौकार व ६ षटकारांसह ४२ धावा केल्या. जहूर खानने ११ चेंडूत ३ चौकार व ४ षटकारांसह ३७ धावांची वादळी खेळी केली. स्टुअर्ट बिन्नीने भारतासाठी ३ बळी घेतले.

भारताकडून कर्णधार रॉबिन उथप्पाने १० चेंडूंत ३ चौकार व ५ षटकारांसच्या मदतीने ४३ धावांची खेळी केली. शेवटच्या षटकात विजयासाठी ३२ धावांची गरज होती आणि स्टुअर्ट बिन्नीने तुफान फटकेबाजी केली. बिन्नीने या षटकात ४,१,६,६,६,६ अशा पहिल्या ५ चेंडूंत २९ धावा कुटल्या. शेवटच्या चेंडूवर ३ धावा हव्या असताना बिन्नी दुसरी धाव घेण्याच्या प्रयत्नात धावचित झाला आणि भारताला ३ बाद १२९ धावांवर समाधान मानावे लागले. यावेळी अवघ्या १ धावेने भारताला हार पत्करावी लागली

दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने १५ धावांनी भारताचा पराभव केला. इंग्लंडच्या १ बाद १२० धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला ३ बाद १०५ धावा करता आल्या. इंग्लंडचा कर्णधार रवी बोपारा व समित पटेल यांनी वैयक्तिक अर्धशतकं झळकावली. रवीने १४ चेंडूंत ८ षटकार खेचून ५३ धावा, तर समितने १८ चेंडूंत ४ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने ५१ धावा कुटल्या. भारताकडून भरत चिपली (२१), श्रीवत्स गोस्वामी (२७) यांनी चांगली सुरूवात केली. केदार जाधवने १५ चेंडूंत ४ चौकार व ५ षटकारांसह ४८ धावांची खेळी केली. पण, तो पराभव टाळू शकला नाही.

# 'लीग ऑफ लिजंड्स करंडक' स्पर्धा



**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे पहिल्या 'लीग ऑफ लिजंड्स करंडक' (४० वर्षावरील गट) १०० चेंडू क्रिकेट स्पर्धेत फ्रेन्ड्स क्रिकेट क्लबने रेवेल विनर्स संघाचा ९ गडी राखून पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले आहे. तर, रायगड वॉरीयर्स संघाने भाऊ कोकणे क्लबचा १ गडी राखून पराभव करत स्पर्धेत रौप्यचषक पटकावले आहे.

दापोली येथील रॉयल गोल्डफिल्ड क्लब मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या सुवर्णचषकाच्या लढतीमध्ये पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या रेवेल विनर्स संघाचा डाव ९१ धावांवर मर्यादित राहीला. अरविंद चौहान (२५) आणि सौरभ रवालिया (नाबाद २४) यांनी संघाचा डावाला आकार दिला. सचिन कापडे याने १५ धावांमध्ये ४ गडी बाद करून रेवेल संघाच्या डावाला वेसण घातली. फ्रेन्ड्स क्रिकेट क्लबने हे लक्ष्य ८० चेंडू व १ गडी गमावून पूर्ण केले. सचिन जयवंत (नाबाद ३७), हृषीकेश मस्त्ये (२७) आणि श्रीनिवास सरवदे (२२) यांनी संघाला सहज विजय मिळवून देत विजेतेपदाला गवसणी घातली आहे.

रौप्यचषकाच्या लढतीमध्ये सतिश देवकर याने केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे रायगड वॉरीयर्स संघाने भाऊ कोकणे क्लबचा एक गडी राखून पराभव केला आणि विजेतेपद मिळवले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण रोशन मोरे, स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंटचे सनी मारवाडी आणि अमित काळे यांच्या हस्ते करण्यात आले.




धावीर क्रीडा मंडळ बेलकडे कबड्डी संघाने बेलकडे येथील मैदानावर शुक्रवारी (दि.१) सरावाचा शुभारंभ केला. यावेळी बेलकडे ग्रामपंचायतीचे सरपंच संजय पाटील उपस्थित होते. दरम्यान, त्यांचा वाढदिवसही यावेळी केक कापून करण्यात आला. यावेळी उपस्थित मंडळाच्या खेळाडू व युवकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. (छायाचित्र : रुपेश पाटील)

## कुमार गटात पहिले तर कुमरी गटात आठवे जेतेपद

# धाराशिवची दुहेरी मुकुटाला गवसणी





**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

सुवर्ण महोत्सवी कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत धाराशिवच्या दोन्ही गटाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला आहे. तसेच, सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूसाठी असलेले सावित्री पुरस्कार तन्वी भोसले हिने व विवेकानंद पुरस्कार सोत्या वळवी या खेळाडूंनी पटकाविला आहे. मुलींच्या गटात सोलापूर, ठाणे तर मुलांच्या गटात सोलापूर व पुण्याने अनुक्रमे तृतीय व चतुर्थ स्थान संपादिले आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत मुलींच्या अंतिम सामन्यात धाराशिवने सांगलीचा ११-९ असा २ गुणांनी पराभव केला. मध्यंतराची ६-४ ही २ गुणांची आघाडीच त्यांना विजय मिळवून देऊन गेली. मुलांच्या अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात जादा डावांमध्ये धाराशिवने सांगलीवर २३-२२ असा २.३० मिनिटे राखून १ गुणाने पहिला विजय साजरा केला. शेवटपर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या या सामन्यात मध्यंतराला १०-७ अशी तीन गुणांची आघाडी धाराशिवकडे होती. यानंतर मात्र, सांगली संघाने दुसऱ्या डावात जोरदार मुसंडी मारत आक्रमण केले व धाराशिवला १६-१६ असे बरोबरीत रोखले. जादा डावात मात्र धाराशिवने २.३० मिनिटे राखून ७-६ अशी बाजी मारली. धाराशिवने कुमार गटात पहिलेच विजेतेपद पटकावले असून मुलींच्या गटात विजेतेपदाच्या चौकारासह (२०२१-२२ पासून सलग चौथे विजेतेपद) एकूण आठवे विजेतेपद मिळवत दिवाळी धमाका साजरा केला आहे.

**सर्वोत्कृष्ट खेळाडू :-**
**अष्टपैलू: सोत्या वळवी, तन्वी भोसले (धाराशिव).**
**संरक्षक: विलास वळवी (धाराशीव), सानिका चाफे (सांगली).**
**आक्रमक : अश्विनी शिंदे (धाराशिव), प्रज्वल बनसोडे (सांगली).**

# महाराष्ट्र खो-खो संघ जाहीर

## १७ नोव्हें. रोजी प्रशिक्षण शिबीर

**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

उत्तर प्रदेश येथील अलीगड येथे २५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत ४३व्या कुमार व कुमारी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे दोन्ही संघ महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी जाहीर केले आहेत.

धाराशिव येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतून संघ निवडण्यात आले आहेत. यावेळी हे संघ प्रशांत कदम, गोविंद शर्मा, संदीप चव्हाण व भावना पडवेकर या निवड समिती सदस्यांनी निवडले आहेत. या संघात धाराशिवबरोबरच सांगली, सोलापूर, ठाणे, पुणे, अहिल्यानगर, सातारा, नाशिक, मुंबई उपनगर, रत्नागिरी, जालना या जिल्ह्यातील खेळाडूंचा समावेश आहे. या संघाचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर १७ नोव्हेंबरपासून मुंबईतील लालबाग येथील ओम साईश्वर मंडळ येथे होणार आहे.

**कुमार गट :** सोत्या वळवी, विलास वळवी, भरत वळवी, राज जाधव, जितेंद्र वसावे (सर्व धाराशिव), प्रज्वल बनसोडे, प्रेम दळवी, पार्थ देवकाते (सर्व सांगली), कृष्णा बनसोडे, शुभम चव्हाण (सर्व सोलापूर), आशिष गौतम (ठाणे), चेतन गुंडगळ, भावेश माशिरे (सर्व पुणे), अनय वाल्हेकर (अहिल्यानगर), प्रतिक जगताप (सातारा), प्रशिक्षक : युवराज जाधव (सांगली).

**कुमारी गट :** अश्विनी शिंदे, तन्वी भोसले, सुहानी धोत्रे, प्रणाली काळे (सर्व धाराशिव), सानिका चाफे, प्रतीक्षा बिराजदार, धनश्री तामखडे (सर्व सांगली), प्राजक्ता बनसोडे, स्नेहा लामकाने (सर्व सोलापूर), दीक्षा काटेकर, धनश्री कंक (सर्व ठाणे), सुषमा चौधरी (नाशिक), दिव्या गायकवाड (मुं. उपनगर), रिद्धी चव्हाण (रत्नागिरी), जोया शेख (जालना), प्रशिक्षक : श्रीकांत गायकवाड (मुंबई), व्यवस्थापिका सुप्रिया गाढवे (धाराशिव).

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)